दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -७३ | मंगळवार दि.१८ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-73 | Tuesday, Dt.18 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीड नगरपालिकेत नगराध्यक्ष सह नगरसेवकांसाठी ऐतिहासिक अर्ज दाखल

## बीड जिल्ह्यातील ५ नगरपालिकेत होणार राष्ट्रवादी विरुद्ध भाजपा तुल्यबळ लढत परळीत धनंजय मुंडेंचाच बोलबाला !


समर्थ राजयोग
बीड । वैभव स्वामी

बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिका पैकी परळी वगळता बीडसह गेवराई, माजलगाव, धारूर आणि अंबाजोगाई या पाच नगरपालिकेमध्ये भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशी सरळ सरळ लढत होणार आहे. परळीत मात्र भाजपा धनंजय मुंडे यांच्या सोबत असल्यामुळे या ठिकाणी अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादीचा वर चष्मा राहणार आहे. बीड नगरपालिकेमध्ये नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी शेवटच्या दिवशी उमेदवारांनी तोबा गर्दी केली. अनेक उमेदवारांना वेळेअभावी आपले उमेदवारी अर्ज दाखल करता आले नाहीत. तरी देखील ज्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले ती संख्या ऐतिहासिक ठरली आहे.

बीड जिल्ह्यातील सहा पैकी ५ नगरपालिकेच्या निवडणुका मोठ्या चुरशीच्या होणार आहेत. बीड नगरपालिकेमध्ये ऐनवेळी अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला हाबाडा देत युवा नेते डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी भाजपाचे कमळ हातात घेतल्यामुळे बीड नगरपालिकेमध्ये भाजपा थेट तुल्यबळ पक्ष ठरला आहे. आता बीड नगरपालिकेमध्ये शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, अजित दादांची राष्ट्रवादी काँग्रेस, डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि एम आय एम असे चार पक्ष रिंगणात उतरल्यामुळे या ठिकाणी चौरंगी लढत होईल. या लढतीमध्ये काँग्रेस पक्ष स्वबळावर निवडणूक लढवणार असल्यामुळे हा पक्ष किती मते घेतो यावर बरेच राजकीय समीकरणे अवलंबून ठरणार आहेत. यासह आम आदमी पार्टी व इतर पक्ष देखील निवडणूक आखाड्यात उतरले आहेत. बीड नगरपालिकेमध्ये नगराध्यक्ष पदाच्या एका जागेसाठी ४६ पेक्षा अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. तर ५२ नगरसेवक पदासाठी ३०० पेक्षा अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाल्याचे खात्रीशीर रित्या समजते. रात्री उशिरापर्यंत दाखल झालेल्या उमेदवारांच्या अर्जाची जमा बेरीज सुरू असल्यामुळे अधिकृत आकडा प्रशासनाकडून समजू शकला नाही. मात्र प्राप्त माहितीनुसार मराठवाड्यामध्ये बीड नगरपालिकेत सर्वाधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याचे खात्रीशीर रित्या समजते.

गेवराई नगरपालिका निवडणुकीत माजी आमदार लक्ष्मण आण्णा पवार बाळराजे पवार यांच्या ताकतीला आता माजी आमदार बदामराव पंडित यांनी थेट भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे भाजपाची ताकद आहे त्यापेक्षा दुपटीने वाढली आहे.यामुळे गेवराई नगरपालिका निवडणुकीत माजी आमदार अमरसिंह पंडित आणि त्यांचे बंधू गेवराई विधानसभेचे आमदार विजयराजे पंडित यांची राजकीय प्रतिष्ठा बीडसह आता गेवराई मध्ये देखील पणाला लागणार आहे. या पालिकेमध्ये

(उर्वरीत पान २ वर)



### आज कोणाचे उमेदवारी अर्ज उडतात आणि कोणाचे राहतात याकडे लक्ष ?

नगरपालिका निवडणुकीमध्ये आज १८ नोव्हेंबर रोजी उमेदवारांच्या अर्जाची छाननी होणार आहे. यामध्ये अनेक उमेदवारांचे अर्ज बाद होण्याची शक्यता आहे. जर प्रमुख पक्षांच्या उमेदवारांचे नगराध्यक्ष सह नगरसेवक पदाच्या उमेदवारांचे अर्ज जर छाननी मध्ये उडले तर त्या पक्षांची नाचक्की होईल अशी शक्यता आहे. त्यामुळे कोणाचे अर्ज उडतात आणि कोणाचे उमेदवारी अर्ज वैद्य ठरतात याकडे आज सर्वांचेच लक्ष वेधणार आहे.

### निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ऑफलाईन अर्ज उपलब्ध

### ऑनलाइन वाले आणि नोटरी वाले झाले मालामाल ?

नगरपालिका अंतर्गत उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावेत असे आदेश निवडणूक विभागाचे होते. यामुळे ऑनलाइन सेंटरवर उमेदवारांकडून अव्वाच्या सव्वा रकमा ई सेंटर चालकांकडून घेण्यात आल्या. एक उमेदवारी अर्ज भरून घेण्यासाठी १००० ते २००० रुपये पर्यंत उमेदवारांकडून रक्कम घेण्यात आल्या.तर नोटरी चालकांकडून सुट्टीच्या दिवशी देखील नोटरी वकील कोर्टात येऊन उमेदवारांच्या नोटरी करून देत होते. पाचशे रुपये पासून ते उमेदवारांच्या आर्थिक परिस्थितीनुसार या ठिकाणी रक्कम दोन हजार रुपयापर्यंत घेण्यात आल्यामुळे नोटरी चालक आणि ऑनलाईन चालक दोघेही मालामाल झाले. यामध्ये मात्र इच्छुक उमेदवारांची अर्ज दाखल करण्यापूर्वीच बऱ्यापैकी जिरली. त्याचबरोबर कागदपत्रांची जमा जमा करता करता चांगलीच दमछाक इच्छुक उमेदवारांची झाली.

### ऐनवेळी ऑफलाइन अर्ज स्वीकृती..

उमेदवारांचे उमेदवारी अर्ज ऑनलाईनच स्वीकारले जातील असे जाहीर केलेले असताना उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दोन दिवस आधी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ऑफलाईन अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आणि ऑफलाइन अर्ज देखील भरून दिले तर चालतील असे फर्मान सोडण्यात आले.तोपर्यंत ऑनलाइन चालकांनी बऱ्यापैकी उमेदवारांची गार केली होती. सुरुवातीपासूनच जर ऑफलाइन उमेदवारी अर्ज ठेवले असते तर उमेदवारांना नाहक खर्चात पडण्याची गरज पडली नसती. याला जबाबदार कोण ?

# बीड नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजपकडून डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार

बीड ।प्रतिनिधी

बीड नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजपकडून डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे (घोमरे) यांनी नगराध्यक्ष पदाचा अधिकृत उमेदवारी सोमवारी (दि.१७) अर्ज दाखल केला. त्याचबरोबर बीड नगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय जनता पार्टीने कमळ या चिन्हावर नगराध्यक्षांसह सर्व ५२ उमेदवार ताकतीने उभे केल्यामुळे या निवडणुकीत नगण्य समजला जाणारा भाजपा आता तुल्यबळ पक्ष म्हणून रिंगणात उतरला आहे. यामुळे बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत चूरस वाढणार हे नक्की.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या सर्वच जागांवर आम्ही कमळ चिन्हावर निवडणूक लढवत आहोत. नगरपरिषद निवडणुकीत 'कमळ' फुलणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ.ज्योती घुंबरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना डॉ.योगेश

(उर्वरीत पान २ वर)

### भाजपने पहिल्यांदाच बीड नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षांसह सर्व ५२ उमेदवार रिंगणात उभे केल्याने निवडणुकीत चुरस वाढणार !





### उच्चशिक्षित उमेदवाराला भाजपने दिली संधी

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे उच्चशिक्षित असून भूलतज्ञ आहेत. त्यांचे पती डॉ.रविंद्र हेही वैद्यकीय व्यवसायातच कान, नाक, घसा व कॅन्सर तज्ञ आहेत. तसेच, डॉक्टर असलेल्या सारिकाताई क्षीरसागर ह्या देखील वॉर्ड क्रमांक १५ मधून निवडणूक लढवत आहेत. यांसह इतरही उच्चशिक्षित व स्वच्छ प्रतिमा असलेल्या उमेदवारांना भाजपने संधी दिली आहे.

### डॉ.योगेश क्षीरसागरांच्या प्रवेशामुळे भाजपला 'बूस्टर'

बीड शहरात गेल्या अनेक वर्षांत भाजपचा केवळ एकच नगरसेवक निवडून आला होता. मात्र अलीकडेच डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केलेल्या प्रवेशामुळे पक्षाला नवा बूस्टर डोस मिळाल्याचे राजकीय वातावरणात संकेत मिळत आहेत. डॉ.क्षीरसागर यांच्या आगमनामुळे पक्षाची संघटनात्मक ताकद वाढल्याचे मानले जात असून निवडणुकीत या प्रभावाचा परिणाम दिसून येईल, अशी चर्चा शहरात रंगली आहे.



### स्वामी रामनंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ति संग्रामात अमुल्य योगदान – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


#### स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे व कमल तलावाचे मुख्यमंत्र्याच्या हस्ते लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ति संग्रामाच्या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणाईमध्ये देशभक्ती जागृत करून महिला व अनेक स्वातंत्र्यसैनिकांना सोबत घेऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त केले. हे योगदान अमुल्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

क्रांती चौक येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे अनावरण करून लोकार्पण केले. तसेच याच ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने ऐतिहासिक कमल तलावाचेही लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल

(उर्वरीत पान २ वर)



### भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार गोपीनाथ गडावर नतमस्तक

#### मंत्री पंकजाताईंनी सहा पैकी पाच ठिकाणी भाजपचे उमेदवार रिंगणात उतरवले ?

**नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बीडमधून डॉ ज्योती घुंबरे, अंबाजोगाईतून नंदकिशोर मुद्डा, गेवराई मधून गीता भाभी पवार, धारूर येथे रामचंद्र निर्मळ तर माजलगाव मधून संध्या मेंडके असे तगडे उमेदवार दिल्याने रंगत वाढणार..!**

परळी ।प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदासाठी रिंगणात उतरलेल्या जिल्ह्यातील सर्व उमेदवारांनी गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्व उमेदवारांना यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नगरपरिषद निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. जिल्ह्यातील सहा पैकी पाच ठिकाणी भाजपचे उमेदवार रिंगणात उतरले आहेत. तर परळीत महायुतीचा उमेदवार आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

(उर्वरीत पान २ वर)

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ई-केवायसीला मुदतवाढ!




बीड/प्रतिनिधी

मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे,उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संपूर्ण राज्यात अतिशय यशस्वी रित्या राबवली जात आहे. याबाबत दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी सर्व लाभार्थ्यांनी इ केवायसी प्रक्रिया करावी अशा सूचना यापूर्वी देण्यात आल्या होत्या.परंतु,गेल्या काही दिवसांत राज्यात आलेल्या नैसर्गिकआपत्ती आणि इतर अडचणींमुळे, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील अनेक पात्र भगिनींना इकेवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नाही,याची पूर्ण कल्पना आहे.या अडचणींची गांभीर्याने नोंद घेत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

लाडकी बहीण योजनेच्या ई केवायसी करण्याची अंतिम मुदत आता

(उर्वरीत पान २ वर)

# दलित मित्राच्या लेकीला राष्ट्रवादी नगराध्यक्ष करणार - मा.आ.अमरसिंह पंडित

## मनोहर वंजारे यांची कन्या प्रेमलता पारवे ५२ उमेदवारांसह महायुतीच्या उमेदवार

बीड ।प्रतिनिधी

गेली तीन दिवस उमेदवाराच्या निवडीबद्दल वैचारीक, सामाजिक व राजकीय अभिसरण साधले जात असताना राष्ट्रवादी पक्षाकडून उमेदवार कोण ? या प्रश्नाचे उत्तर काल समोर आले. राष्ट्रवादीचे सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी दलित मित्र माजी जिल्हा परिषद सदस्य मनोजरराव वंजारे यांच्या कन्या निवृत्त नायब तहसिलदार प्रेमलता पारवे यांची उमेदवारी जाहिर केली. सोबतच शिवसेना व शिवसंग्राम यांना सोबत घेत असल्याचे जाहिर करताना सक्षम राजकीय पर्याय देत असल्याचे माध्यमांना सांगितले.



आम्ही प्रामाणिक आणि सक्षम मित्र निवडला - अनिल जगताप

आमच्याकडे भाजपचा देखील प्रस्ताव होता मात्र मतदारांच्या समोर मते मागताना प्रामाणिकता आणि सक्षम मित्र असेल तरच आम्ही निवडून येऊ शकतो असा आमचा विश्वास आहे. अशाप्रकारे आम्ही उपमुख्यमंत्री आमचे नेते ना.एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला आणि त्यांच्या आदेशाने राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यासोबत जाण्याचे नक्की केले असे जिल्हा प्रमुख अनिलदादा जगतापयांनी पत्रकारांना सांगितले.

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



## संपादकीय

# निष्काळजीपणाचा स्फोट

श्रीनगर नौगाम स्फोटात ९ जण ठार, तर ३२ जण जखमी झाले. लाल किल्ल्याच्या समोर झालेल्या बॉम्बस्फोटाच्या बरोबर पाचव्या दिवशी हा स्फोट झाला. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या संयुक्त सचिव आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या पोलीस महासंचालकांनी या स्फोटाला अपघाती म्हटले असले तरीही हा स्फोट भारताच्या अंतर्गत सुरक्षेला असलेला धोका म्हणून समोर आला आहे हे निश्चित. गृह मंत्रालयाने हा दहशतवादी हल्ला नाही असे म्हटले असले तरीही सुरक्षाकर्मी कसे निष्काळजीपणे वागून आपले आणि इतरांचेही जीव धोक्यात घालतात असे या घटनेवरून लक्षात आले आहे. स्फोट इतका भीषण होता की, त्या स्फोटाचा आवाज एक किलोमीटरपेक्षाही जास्त अंतरावर ऐकू आला. पण या घटनेनंतर आता अनेक बाबी समोर आल्या आहेत. फरिदाबाद येथे स्फोटके मिळतात. उरलेल्या दहशतवाद्याच्या साथीदारांना शोधण्याचे काम सुरू ठेवले असते, तर लाल किल्ल्याच्या जवळ झालेल्या स्फोटात अनेकांचा जीव गेला नसता आणि त्यानंतर हा नौगाम स्फोटाची घटना घडली नसती. हा स्फोट जरी अधिकारी स्तरावरून अपघाती म्हटला गेला असला तरीही तो तसा नव्हता. कारण त्यात सुरक्षाकर्मींची बेपर्वाई आणि ढिसाळपणा कारण होता हे यातून स्पष्ट झाले आहे. मुळात फरिदाबादमध्ये सापडलेली स्फोटके काश्मीरमध्ये नेण्याची काहीच गरज नव्हती. फरिदाबादमध्ये ती निकामी करण्यात आली असती, तर ९ जणांचे जीव गेले असते ते गेले नसते. फरिदाबाद येथे सापडलेल्या स्फोटकांची हाताळणी करताना स्फोट झाला असे पोलिसांचे म्हणणे आहे. याचा अर्थ पोलिसांना स्फोटके कशी हाताळायची याचे प्रशिक्षण नव्हते का, असा प्रश्न उपस्थित होतो. आता नौगाम येथील स्फोट स्थळ माध्यमांचे आकर्षण केंद्र झाले आहे. नौगाम स्फोट ही अलीकडच्या काळात पोलीस ठाण्यात झालेल्या सर्वात विनाशकारी स्फोटांपैकी एक आहे असे बोलले जाते. केवळ जीव गमावले, कुटुंबे उद्ध्वस्त झाली आणि घरांचे नुकसान झाले एवढ्यापुरती ही गोष्ट थांबणारी नाही, तर वेदनादायक बाब म्हणजे दहशतवादी तपासादरम्यान घडलेली ही घटना आहे. एका व्हाईट कॉलर मोड्यूलचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आणि तो आनंद फार काळ टिकला नाही, तर तपासादरम्यान हा स्फोट होऊन नऊ जणांचा जीव गेला आहे.

स्थानिक अधिकाऱ्यांच्या समर्पण आणि दृढ निश्चयामुळे एक मोठा दहशतवादी कट उधळून लावण्यात आला पण फरिदाबाद स्फोटकांच्या तपासातून मिळवलेले ज्वलनशील पदार्थांच्या बाबतीत जी अक्षम्य ढिलाई आणि निष्काळजीपणा केला गेला त्यामुळे या कष्टसाध्य यशावर पाणी पडले आहे. डीजीपींनी या प्रकारात दहशतवादाची शक्यता फेटाळून लावली आहे आणि त्यामुळे हा दिलासा असला आणि अफवांना पसरू दिले नाही, तरीही अवघड प्रश्न ते लपवू शकलेले नाही. या घटनेनंतर काही प्रश्न नव्याने उपस्थित झालेत. स्फोटानंतर करण्यात यावयाच्या उपाययोजना आणि प्रक्रियात्मक त्रुटींचे गांभिर्य स्फोटाच्या प्रमाणावरून स्पष्ट होते.



गेवराई (जिल्हा प्रतिनिधी शेख जावेद सर ) भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी भाजपा आमदार सुरेश धस आणि नुकताच भाजपामध्ये प्रवेश केलेले डॉ योगेश क्षीरसागर व डॉ सारिकाताई क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट दिली.

# राजकीय वारसा नाही, पण जनसेवा आहे!

# आम्रपाली साबळे नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत!

## बीडच्या राजकारणात 'आपली लेक' आम्रपाली साबळेंचा धडाकेबाज प्रवेश!



बीड: बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीत महिला अनुसूचित जाती प्रवर्गासाठी जागा आरक्षित झाल्यामुळे, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्रीमती आम्रपाली सचिन साबळे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करत एक महत्त्वपूर्ण राजकीय पाऊल उचलले आहे. कुठलाही राजकीय वारसा नसताना, 'आपली लेक' म्हणवणाऱ्या आम्रपाली साबळे यांनी थेट जनतेच्या सेवेसाठी आणि न्यायासाठी लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

### जनतेचे हास्य हेच बक्षीस

आम्रपाली साबळे यांनी जनतेशी भावनिक जोड साधताना सांगितले की, तुमच्या चेहऱ्यावरचे हास्य हेच माझे खरे बक्षीस आहे. तुमच्या डोळ्यातील अश्रू पुसून, तुमच्या जीवनातील दुःख कमी करण्यासाठी मी अहोरात्र कष्ट करते. आरक्षणाच्या संधीचा फायदा घेत, सामाजिक न्यायाच्या भूमिकेवर लढणाऱ्या आम्रपाली साबळे यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे बीड नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाची लढत आता अत्यंत लक्षवेधी ठरणार आहे.

सामाजिक कामातून राजकारणाकडे

अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यात निस्वार्थ काम, समाजसेवा करत असलेल्या आम्रपाली साबळे यांच्या एन्ट्रीमुळे ही निवडणूक आता रोचक आणि चुरशीची होण्याची शक्यता आहे. त्यांची भूमिका 'राजकीय' नसून 'सामाजिक' आहे.

कुठलाही राजकीय वारसा नाही: त्या कुठल्याही राजकीय घराण्यातील नसून, जनतेचा विश्वास आणि कुटुंबाचा पाठिंबा हाच त्यांचा आधार आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८५१/२०२५**
छबुबाई नारायण आडे वि.निरंक
**(मार्फत–ॲड.राठोड एस.व्ही.)**

ज्याअर्थी मयत नामे **धारू पेमा राठोड हे दि.२७.११.२०२४ रोजी धोंडराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.छबुबाई नारायण आडे वय–६४ वर्षे, धंदा–घरकाम, रा.रामनगर तांडा, पो.धोंडराई ता.गेवराई जि.बीड, २.गोरख धारू राठोड वय–४४ वर्षे, रा.झिरपी तांडा, ता.अंबड जि.जालना, ३.गोविंद धारू राठोड वय–४३ वर्षे, धंदा–शेती, रा.झिरपी तांडा, ता.अंबड जि.जालना** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **धारू पेमा राठोड रा.सदर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१८/११/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



बीड ।प्रतिनिधी

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी, ता. केज जि.बीड संचालित,गुरुनानक प्राथमिक विद्यालय,शाहूनगर,बीड येथे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार एस. ए. या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री गदळे आर. ए.आणि ठोकरे एम.व्हि.हे लाभले.कार्यक्रमाच्या सुरवातीस मान्यवरांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन झाल्यास. विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली यात संग्राम जाधव ,अनुश्री गदळे, जाधव अमृता, जिशान बागवान, आरोही शेळके, आदिरा पव्हणे यांनी चाचा नेहरू यांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली. श्री गदळे सर आणि ठोकरे सर यांनी पंडित नेहरू यांच्या जीवनातील काही महत्वाचे प्रसंग विद्यार्थ्यांना सांगून चाचा नेहरू खरोखरच मुलांचे आवडते का होते,त्यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान याचे बारकाव्याने वर्णन केले. बालदिन साजरा करण्यासाठी विद्यार्थी आज छान रंगबेरंगी कपडे परिधानकरून आले होते,सर्व विद्यार्थ्यांना श्रीमती डोंगरे मॅडम यांनी पेन,पेन्सिल,पुस्तके भेट दिली तर बालदिनानिमित्त त्यांना शाळेतर्फे खाऊ वाटप केल्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४२/२०२५**
मदन पि.केरभान करडे व इतर वि.निरंक
**(मार्फत–ॲड.ए.बी.बांगर, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **मैनाबाई भ्र.केरभान करडे, रा.राजुरी मळा तहत तलवाडा ता.गेवराई जि.बीड हे दि.२८.१०.२०२५ रोजी राजुरी मळा तहत तलवाडा, ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.मदन पि.केरभान करडे, वय–५५ वर्षे. धंदा–शेती, रा.राजुरी मळा तहत तलवाडा ता.गेवराई जि.बीड, २.कैलास पि.केरभान करडे, वय–५० वर्षे, धंदा–शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बाबुराव पि.धोंडीबा बेद्रे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१५/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –२३/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालय**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४०/२०२५**
माणिकराव भानुदास बारहाते वि.निरंक
**(मार्फत–ॲड.लोंडे कृष्णा व्हि.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **भानुदास पि.यशवंता बारहाते हे दि.१७.०४.१९८९ रोजी कोळगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.माणिकराव पि.भानुदास बारहाते, वय–६५ वर्षे, रा.कोळगांव ता.गेवराई जि.बीड, २.रतन पि.भानुदास बारहाते, वय–६० वर्षे, धंदा–शेती, रा.सदर, ३.कुसूम पि.विठ्ठल जोगदंड, वय–६३ वर्षे, धंदा–शेती, रा.सदर, ४.अण्णा पि.भानुदास बारहाते, वय–७० वर्षे, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **भानुदास पि.यशवंत बारहाते** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१५/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१९/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९३३/२०२५**
निता पि.मोहन उबाळे व इतर वि.निरंक
**(मार्फत–ॲड.ए.ए.शिंदे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **शिला भ्र.मोहन उबाळे रा.भेंडटाकळी ता.गेवराई जि.बीड हे दि.०७.११.२००७ रोजी भेंडटाकळी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.निता पि.मोहन उबाळे वय–३२ वर्षे, धंदा–घरकाम, रा.भेंडटाकळी ता.गेवराई जि.बीड, २.गिताबाई भ्र.गणेश गात, वय–३७ वर्षे, धंदा–घरकाम व शेती, रा.शिरापुर गात, ता.शिरूर कासार जि.बीड, ३.भागवत पि.मोहन उबाळे, वय–३४ वर्षे, धंदा–शेती, रा.भेंडटाकळी ता.गेवराई जि.बीड, ४.मोहन पि.महादेव उर्फ महादु उबाळे वय–६२ वर्षे, धंदा–शेती, रा.भेंडटाकळी ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **शिला भ्र.मोहन उबाळे रा.भेंडटाकळी ता.गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१५/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –२२/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८८३/२०२५**
त्रिबंक मसु नवले वि.निरंक
**(मार्फत–ॲड.ए.ए.शिंदे, गेवरवाई)**

ज्याअर्थी मयत नामे **मसु पि.बापुराव नवले हे दि.०७.१२.२०२३ रोजी रूई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

**अर्जदार नामे–**

**१. त्रिबक पि. मसु नवले, वयः ५५ वर्षे, धंदाः शेती रा. रुई, ता. गेवराई जि.बीड २. अनुराधा भ्र. बळीरम नवले, वय ४३ वर्षे, धंदा: शेती व घरकाम रा. रुई, ता. गेवराई जि.बीड ३. राम पि.बळीराम नवले वय २३ वर्षे धंदा. शेती रा. रूई, ता. गेवराई जि.बीड ४. लखन पि.बळीराम नवले वय.२३वर्षे धंदा. घरकाम रा. रूई, ता. गेवराई जि.बीड ५. मनिषा भ्र. भरत खुणे वय: २७वर्षे, धंदाः शेती व घरका मरा. जळगाव मजरा ता. गेवराई जि.बीड ६. आशा भ्र. आबासाहेब पवार वय २५ वर्षे, धंद:शेती व घरकाम रा.पोखरी, ता. गेवराई जि. बीड** याना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मसु पि.बापुराव नवले** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.३०/१०/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०३/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

पान १ वरून...

**बीड नगरपालिकेत ....**

अजित दादांचे राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भाजपा अशी सरळ दुरंगी फाईट होईल.

माजलगाव नगरपालिका निवडणुकीत सर्वांनीच स्वबळाचा नारा दिल्यामुळे या ठिकाणी चौरंगी लढत होणार असली तरी देखील भारतीय जनता पार्टीने देखील तगडा उमेदवार दिल्यामुळे रंगत येणार आहे. माजलगाव नगरपालिकेवर अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके आणि युवा नेते जयसिंह भैया सोळंके यांचा वर चष्मा दिसून येत आहे.

किल्ले धारूर नगरपालिका निवडणुकीमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भारतीय जनता पार्टी अशी सरळ लढत होणार आहे.त्यामुळे या ठिकाणी सुद्धा तुल्यबळ लढत पाहायला मिळणार आहे.

अंबाजोगाई नगरपालिकेमध्ये नगरपालिकेवर कायम वर्चस्व असलेल्या पापा मोदी यांच्याविरुद्ध दस्तूर खुद्द नंदकिशोर मुंदडा उर्फ काकाजी हे स्वतः भाजपा कडून नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवण्यासाठी रिंगणात उतरल्यामुळे अंबाजोगाई नगरपालिकेची निवडणूक सुद्धा काट्याची निवडणूक होणार आहे.

यामुळे या पाचही नगरपालिकेवर कोणाचा झेंडा फडकेल हे आज तरी स्पष्ट होणे अशक्य आहे.या पाचही नगरपालिकेत काट्याची आणि तुल्यबळ निवडणूक होईल यात शंका नाही. कोण कोणाची किती मते खाणार यावर विजयी उमेदवाराचे भवितव्य अवलंबून असल्याने धक्कादायक निकाल या पाच ठिकाणी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

परळीत मात्र धनंजय मुंडे यांनी आपला गड आणि किल्ला नगरपालिकेत अबाधित ठेवण्यामध्ये यश मिळवले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यामध्ये धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उभारी घेतली आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील परळीतील राष्ट्रवादी काँग्रेस अशी सरळ लढत या ठिकाणी होईल. आज तरी धनंजय मुंडे यांचे निर्विवाद वर्चस्व स्पष्टपणे दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकें पैकी एकमेव परळी नगरपालिकेवर आज तरी अजित दादांच्या राष्ट्रवादीचा वर चष्मा दिसून येत आहे.

**भाजपचे नगराध्यक्षपदाचे ....**

डॉ ज्योती घुंबरे (बीड), नंदकिशोर मुंदडा (अंबाजोगाई), गीता भाभी पवार (गेवराई), रामचंद्र निर्मळ (धारूर), संध्या मेंडके (माजलगांव) यांनी सायंकाळी गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी ना. पंकजाताई मुंडे यांचे सर्व उमेदवारांनी निवडणूकीत संधी दिल्याबद्दल आभार मानले. ना. पंकजाताईंनी देखील सर्वांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. नगरपरिषद निवडणूकीत सर्व जागांवर संपूर्ण

पान १ वरून...

ताकदीनिशी विजयश्री खेचून आणण्याचा निर्धार याप्रसंगी उमेदवारांनी केला. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माधव निर्मळ, रूपाली कचरे, विनायक रत्नपारखी, ज्ञानेश्वर मेंडके आदींसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**स्वामी रामनंद तीर्थ ....**

सावे, खासदार संदिपान भुमरे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह मराठवाडा मुक्ति संग्रामात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय उपस्थित होते.

**बीड नगरपरिषद निवडणुकीसाठी ...**

क्षीरसागर यांच्यासह जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष आदित्य सारडा, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर, शहराध्यक्ष अशोक लोढा, ज्येष्ठ नगरसेवक गणेश वाघमारे, डॉ.सारिका क्षीरसागर, इर्शाद शेख यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपने या निवडणुकीत एकूण ५२ उमेदवार रिंगणात उभे केले आहेत. आगामी निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह सर्वाधिक नगरसेवक निवडून आणण्याचा निर्धार पक्षाने व्यक्त केला आहे. विकासाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकत बीड नगरपरिषदेत कमळ फुलविण्याची तयारी भाजपने पूर्ण केल्याचे चित्र आहे.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या सर्वच जागांवर आम्ही कमळ चिन्हावर निवडणूक लढवत आहोत. बीड शहरात प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते आमच्यासोबत घट्ट उभे आहेत आणि आम्ही लगेचच प्रचाराला सुरुवातही केली आहे. या नगरपरिषद निवडणुकीत कमळ फुलताना निश्चित दिसेल. बीडकरांच्या अपेक्षांना न्याय देणारे आणि भविष्यात त्रासदायक न ठरणारे उमेदवार भाजपने जाणीवपूर्वक उभे केले आहेत. गेली ३५ वर्षे बीडकरांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाला आम्ही पात्र ठरलो आहोत. यावेळी हा विश्वास आणखी उत्स्फूर्तपणे वाढेल, असा मला विश्वास आहे.

**दलित मित्राच्या लेकीला...**

आजवर क्षीरसागरांनी शहर लुटले आता विकासासाठी राष्ट्रवादी सोबत – प्रभाकर कोलंगडे

स्व.लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी क्षीरसागरांच्या हुकूमशाहीच्या विरोधात लोकशाहीत लढा दिला. शहर क्षीरसागरांनी अळीपाळीने लुटून खाल्ले, आता मात्र आम्ही असे होवू देणार नाही. राष्ट्रवादी सोबत खांद्याला खांदा लावून निवडणुक लढवणार आणि जिंकणार असे शिवसंग्रमचे राज्यकार्यवाह प्रभाकर कोलंगडे यांनी म्हटले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह

पान १ वरून...

पंडित, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल जगताप, शिवसंग्रामचे राज्य कार्यवाह प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, पक्षाचे निरीक्षक माजी आमदार संजय दौंड, युवकचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, सावता परिषदेचे कल्याण आखाडे, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे शेख निजाम, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, शिवसंग्रामचे जिल्हा कार्यवाह सुहास पाटील, तालुकाध्यक्ष राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक फारुक पटेल, विनोद मुळूक, विलास विधाते, शेख मुजीब, माध्यम प्रमुख भागवत तावरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार, नगरसेवक पदाचे ५२ उमेदवार व राष्ट्रवादी, शिवसेना व शिवसंग्राम पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुख्यमंत्री माझी ..**

दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे. त्या लाभार्थी महिलांनी स्वतःची ई केवायसी करावी व त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र व घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा.न्यायालयाचा आदेश याची सत्यप्रत संबंधित जिल्ह्यातील महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे जमा करावी.या निर्णया मुळे योजनेच्या लाभाची सातत्यता आणि अखंडितता कायम राहणार आहे.ज्या भगिनींनी अद्याप इ केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही,त्यांना विनंती आहे की त्यांनी या विस्तारित मुदतीचा लाभ घेत ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी असे आवाहन करण्यात आले आहे.



बीड – पेडंगाव येथील देवस्थान येथे भव्य अन्नदान करत भाजपा नेते नवनाथ आण्णा शिराळे पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी सर्जेराव तात्या तांदळे, सचिन भाऊ शहागडकर, नागरगोजे सर सह शुभेच्छा देताना.

# पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची ८ फेब्रुवारीला शिष्यवृत्ती परीक्षा!

## अर्ज भरण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने परीक्षेची तारीख जाहीर केली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा आणि बुद्धिमत्ता चाचणी, असे चार विषय असतील. एकूण ३०० गुणांची ही परीक्षा असेल. या परीक्षेसाठी नियमित शुल्कासह २७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाइन भरता येणार आहे. १ ते ३१ डिसेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहेत.शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांना दरवर्षी पाच हजार रुपये आणि सातवीतील विद्यार्थ्यांना साडेसात हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. दरम्यान, नव्या शासन निर्णयानुसार ८




फेब्रुवारीला होणारी पाचवी व आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा ही शेवटची असणार आहे

### विद्यार्थ्यांकडून भरून घेतले जात आहेत अर्ज

यंदा पाचवी व आठवी आणि चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा होणार आहे. पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा ८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. एप्रिल-मे महिन्यात चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन आहे. सध्या विद्यार्थ्यांकडून परीक्षेचे अर्ज भरून घेतले जात आहेत.

### चौथी व सातवीची शिष्यवृत्ती मे महिन्यात

इयत्ता चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अंतिम सत्र परीक्षा झाल्यावर होईल. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून त्याचे वेळापत्रक पुढील महिन्यात जाहीर होईल. शासनाच्या नव्या निर्णयानुसार यापुढे आता चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांचीच शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. दरम्यान, यंदा चौथी, पाचवी, सातवी व आठवीतील १५ हजारांहून अधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा देतील. त्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून भरले जाणार आहे.

# तलवार घेऊन फिरणाऱ्यास अटक बीड शहर पोलिसांची कारवाई

अजीजपुरा भागात तलवार घेऊन फिरत असलेल्या व्यक्तीस बीड शहर पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून चार तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून अवैध शस्त्रधारकांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

सदरील व्यक्ती शेरसिंग हिंदू सिंग टाक, वय अंदाजे ५५ वर्ष, रा. वडवणी, ता.वडवणी जि.बीड असून त्याच्याकडून आणखीही अवैध शस्त्रे मिळण्याची शक्यता आहे.

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सर्व पोलिस ठाणे प्रमुखांना निवडणूक काळात अवैध शस्त्रे जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने बीड शहर पोलिसांनी तत्परता दाखवत ही कारवाई केली आहे.

बीड शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की,कोणाकडेही अवैध शस्त्र, तलवार, दारुगोळा किंवा गावठी पिस्तूल असल्याची माहिती असल्यास

मो. ७५८८८०७७७४ किंवा पीएसआय महेश जाधव - मो.९०२१२१६२५६ यावर कळवावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार व पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली

एपीआय श्री. खेडकर, पीएसआय श्री. महेश जाधव, श्री. गणेश कुमावत तसेच पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशेन उगले, इलियास शेख यांनी केली आहे.



---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४८३ दि.१४.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री नारायण ज्ञानेश्वर बिन्नीवाले, रा.किनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नारायण ज्ञानेश्वर बिन्नीवाले | स्वतः | ०३.०७.१९९६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४१८ दि.१४.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री सत्तारखाँ बाशाखाँ पठाण, रा.नागझरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रेश्मा सत्तारखाँ पठाण | मुलगी | २०.१०.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि-
दिनांक : १२/११/२०२५

वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार श्री जावेद हमीद शेख रा.पिरगैबवाडी ता.घनसावंगी जि.जालना**

## जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **रा.पिरगैबवाडी ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. जावेद हमीद शेख रा.पिरगैबवाडी ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू मोहसीन जावेद शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-०३/०२/२००७** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि-
दिनांक : १२/११/२०२५

वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार श्री जावेद हमीद शेख रा.पिरगैबवाडी ता.घनसावंगी जि.जालना**

## जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **रा.पिरगैबवाडी ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. जावेद हमीद शेख रा.पिरगैबवाडी ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू आदिबा जावेद शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-२०/०१/२००९** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१००२ दि.-.-.-**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सिकंदर बद्रु शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शोएब सिकंदर शेख | मुलगा | ३०.०९.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि-
दिनांक : १७/११/२०२५

वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार श्री जिजाभाऊ विठ्ठल पाईकराव रा.कंडारी परतुर ता.घनसावंगी जि.जालना**

## जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **रा.कंडारी परतुर ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. श्री जिजाभाऊ विठ्ठल पाईकराव रा.कंडारी परतुर ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री अर्णव जिजाभाऊ पाईकराव रा.कंडारी परतुर** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-१४/०१/२०२३** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि-
दिनांक : ०६/१०/२०२५

वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार श्री जावेद हमीद शेख रा.पिरगैबवाडी ता.घनसावंगी जि.जालना**

## जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **रा.पिरगैबवाडी ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. जावेद हमीद शेख रा.पिरगैबवाडी ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू जावेद हमीद शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-१९/०७/१९७८** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि-७७
दिनांक : ०७/१०/२०२५

वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार श्री युसूफ बिबन पठाण, रा.धा.हिवरा ता.घनसावंगी जि.जालना**

## जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **रा.धा.हिवरा ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. युसूफ बिबन पठाण रा.धा.हिवरा ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू बिबन बापुजीभाई पठाण** यांचा त्यांनी मृत्यू ची **दिनांक:-२१/०५/२०२५** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०२३ दि.-.-.-**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शबाना उस्मान शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शबाना उस्मान शेख | स्वतः | ०६.०६.१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११४२ दि.-.-.-**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सिकंदर बद्रु शेख रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिकंदर बद्रु शेख | स्वतः | ०२.०६.१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८६४/२०२५**
कोंडाबाई बाबुराव बेद्रे व इतर
**(मार्फत-ॲड.ए.ए.शिंदे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **बाबुराव पि.धोंडीबा बेद्रे, रा.बेद्रे गल्ली, गेवराई ता.गेवराई जि.बीड हे दि.१६.०५.२०२५ रोजी गेवराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.कोंडाबाई भ्र.बाबुराव बेद्रे, वय-८५ वर्षे, धंदा-घरकाम, रा.बेद्रे गल्ली, गेवराई ता.गेवराई जि.बीड, २.भारत पि.बाबुराव बेद्रे, वय-६० वर्षे, धंदा-शेती, रा.बेद्रे गल्ली, गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बाबुराव पि.धोंडीबा बेद्रे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१८/१०/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०३/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९३०/२०२५**
ताराचंद पि.भानुदास शिंदे व इतर वि.निरंक
**(मार्फत-ॲड.के.एल.पिसाळ, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **भानुदास दशरथ शिंदे, रा.पाडळसिंगी ता.गेवराई जि.बीड हे दि.१७.१०.२०२५ रोजी अनुक्रमे रा.पाडळसिंगी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.ताराचंद्र पि.भानुदास शिंदे, वय-४६ वर्षे, धंदा-नौकरी, रा.पाडळसिंगी ता.गेवराई जि.बीड, २.शहादेव पि.भानुदास शिंदे, वय-५० वर्षे, धंदा-नौकरी, रा.पाडळसिंगी ता.गेवराई जि.बीड, ३.सुभाष पि.भानुदास शिंदे, वय-५४ वर्षे, धंदा-नौकरी, रा.पाडळसिंगी ता.गेवराई जि.बीड, ४. प्रयागाबाई भ्र.भानुदास शिंदे, वय-७१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **भानुदास दशरथ शिंदे, रा.सदर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१५/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -११/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# अंबड शहरात नळाला पंधरा दिवसआड पाणी, नागरिकांच्या घश्याला पडली कोरड

## सत्ताधाऱ्यांच्या विकासाच्या गप्पा म्हणजे नागरिकांच्या सहनशीलतेची परिक्षा

अंबड /प्रतिनिधी

शहरात पाण्याचा प्रश्न आता केवळ टंचाईपुरता उरलेला नाही तर शहरवासीयांच्या सहनशीलतेची कठीण परिक्षा घेणारी ठरत आहे. यामुळे शहरात पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. पंधरा-पंधरा दिवसांनंतर नळाला पाणी सोडले जाते . आणि तेही काही भागात फक्त केवळ ४० मिनिटे तर काही भागात दीड दीड तास पाणी सोडले जाते. विस्कळीत व अन्यायकारक पाणी पुरवठा शहराला अक्षरशः पाणी टंचाईच्या खाई मध्ये ढकलत आहे.

नागरिकांची मागणी फक्त एवढीच आहे की मुबलक पाणी द्या आणि समाधानाने जगू द्या.

पण सत्ताधाऱ्यांच्या गोड गोड गप्पा आणि पोकळ आश्वासने आणि विकास नावाच्या कागदी स्वप्नांमुळे शहराचे खरे भविष्य अंधारात जात असल्याची जोरदार चर्चा आहे. शहराची लोकसंख्या वाढली पण त्या मानाने नागरी सुविधा वाढल्यात का ? उत्तर ठाम नाही वाढत्या लोकसंख्येनुसार पाणीपुरवठा नियोजन, जलस्रोत व्यवस्थापन, पाइपलाइन दुरुस्ती अशा प्राथमिक जबाबदाऱ्या वर्षानुवर्षे सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्षित ठेवलेल्या आहेत. परिणामी आज शहरात एका बादली पाण्यासाठीही नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे. वरवर विकासाच्या गप्पा मारत मोठमोठ्या घोषणा करणाऱ्यांच्या कारभाराने नागरिकांमध्ये रोषाचं वादळ उठत आहे. शहरात पाणीपुरवठ्यावर भेदभाव तुमच्यासाठी-आमच्यासाठीचा खेळ काही भागात दीड तास पाणी आणि काही भागात ३०-४० मिनिटे.

ही असमानता तसेच काही भागात पूर्ण दाबाने तर काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा. त्यावर अधिकाऱ्यांची निष्क्रियता आणि सत्ताधाऱ्यांचे मौन यामुळे नागरिकांचा संताप शिगेला पोहोचला आहे. निवडणूक आली की स्वप्नांचे ढग दाटून येतात आणि निवडणूका संपल्या की शहर पुन्हा अंधारात. निवडणुकीच्या तोंडावर प्रत्येकवेळी नव्या घोषणा सुरू होतात. काय तर म्हणे पाणीपुरवठा सुरळीत करू, नवीन प्रकल्प उभारू.

शहराला पाणीटंचाईतून मुक्त करू. पण निवडणूक संपताच त्या घोषणा धुळीला मिळतात आणि शहर पुन्हा त्या-त्या जुन्या अवस्थेत ढकलले जाते.हे चित्र नागरिकांनी वारंवार अनुभवलं आहे.विकासाच्या नावाखाली बाहेरच्यांचा प्रभाव पण घरचीच विधी ढासळलेली.

शहराच्या मूळ समस्या सोडवण्याऐवजी बाहेरील शक्तींना खूष करण्यासाठी धडपड होत असल्याची कुजबुज सर्वदूर पसरली आहे. घर का भेदी लंका ढाये ही म्हण अंबडच्या परिस्थितीला तंतोतंत शोभून दिसते. नागरिकांचा संताप शिगेला पोहोचला आहे . नागरिक थेट सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारीत आहे की पंधरा दिवसांनी मिळणाऱ्या थेंबभर पाण्यावर कुटुंब कसे चालवायचे ?शहरात लोकसंख्या वाढतेय पण पाणीपुरवठ्याची ठोस योजना कधी येणार ? सत्तेत बसल्यावर शहराच्या प्राथमिक समस्या का विसरल्या जातात ?निवडणुकीच्या तोंडावर दाखवली जाणारी विकासस्वप्ने किती खरी ? शहरवासीयांचा आवाज आता अधिक धारदार अधिक आक्रमक आणि अधिक जागरूक झाला आहे. विकासाची पोस्टरबाजी नको. प्रत्यक्ष काम हवे ही मागणी आता उघडपणे समोर येत आहे.विकासाच्या बडबडीने अंबडचा जीव टांगणीला लागला आहे. वर्षानुवर्षे पाणी पुरवठा व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष केले जात आहे. नवीन योजनांची घोषणा देखील केल्या जातात परंतु कामे मात्र शुन्य. सत्ताधारी फक्त भाषणबाजी, पोस्टरबाजी आणि आश्वासनांचे फुगे फुगवत फिरतात. शहरवासीयांना पाण्यासाठी पाणी पट्टीच्या नावाखाली मोजावे लागतात ४०० ते ५०० रुपये. सत्तेतील मंडळी विकास हा शब्द चघळून लोकांच्या डोळ्यात धूळ फेकत आहे. निवडणुकीच्या आधी स्वप्ने नंतर अंधार ही फसवणूक किती दिवस चालणार? निवडणुका जवळ आल्या की सर्वच नेते मंडळी घोषणा देतात की निवडून आल्यानंतर आपण सर्वप्रथम शहरातील पाण्याचा प्रश्न सोडवणार. परंतु निवडणूक संपली की शहरातील नागरिकांच्या घश्याला आहे ती कोरड कायम राहते. आता मात्र नागरिकांचे लक्ष येऊ घातलेल्या निवडणुकांवर लागले आहेत . बघुया या निवडणुकीनंतर तरी शहरवासीयांची तहान मिटते की कायम राहते.







# माजलगावात होलसेल दुकान फोडून दहा लाखाच्या सिग्रेट पळवल्या

माजलगाव चोरीचे सत्र थांबेना

माजलगाव ।प्रतिनिधी

शहरातील सूर्याचे सत्र थांबत नसून गजानन नगर रोडवर असलेल्या श्रीकृष्ण ट्रेडर्स या होलसेल दुकानाचे शटर वाकून चोरट्याने आतील दहा लाख रुपये किमतीचे सिगारेटचे आठ बॉक्स व नगदी ७५ हजार रुपये लंपास केल्याची घटना सोमवारी सकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घडली असून याप्रकरणी अज्ञात चार चोरट्याविरुद्ध माजलगाव शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शहरातील गजानन रोडवर श्रीकांत श्रीनिवास रूद्रवार यांचे श्रीकृष्ण ट्रेडर्स हे होलसेल दुकान असून ते नेहमीप्रमाणे रविवारी रात्री लवकर दुकान बंद करून गेले होते. सोमवारी त्यांना सकाळी सात वाजता शेजारील दुकानदाराने फोन करून सांगितले की तुमचे दुकान फोडले असून तुम्ही तात्काळ इकडे या यावर ते दुकान कडे गेले असता त्यांना दुकानचे शटर वाकलेले दिसले आत प्रवेश केला असता दुकानातील सिगरेटचे दहा लाख किमतीचे आठ बॉक्स व गल्ल्यातील नगदी ७५ हजार रुपये गायब असल्याचे दिसून आले. तर दुकानातील सीसीटीव्हीचा डीव्हीआर ही चोरट्याने तोडून नेल्याचे दिसले यावरून त्यांनी बाजूला असलेल्या बँकेचे सीसीटीव्ही चेक केले असता दुकान समोर सकाळी पाच वाजता स्विफ्ट गाडीत आलेल्या चार चोरट्यांनी सिगरेट बॉक्स पळवल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी तात्काळ शहर पोलीसशी संपर्क केला असता शहर पोलीस आणि घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्हीची पाहणी करत शहरात अनेक ठिकाणी या वेळेचे सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले असून याप्रकरणी दुकान मालक श्रीकांत श्रीनिवास रूद्रवार यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चार चोरट्याविरुद्ध शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.



# जिल्हा मध्यवर्ती बँक कर्मचाऱ्याला दिवसा चोरट्यांनी २५ लाखाला लुटले...!

पैठण /प्रतिनिधी

पैठण पाचोड राज्य महामार्गावर दावरवाडी शिवारात शनिवार रोजी सकाळी साडे अकरा वाजेच्या सुमारास दुचाकिवरुन आलेल्या दोन चोरट्यांनी बँकेचे लिपिक गणेश पहिलवान यांची स्कुटी क्र ( एम एच २० डि झेड ८३७४ ) या गाडीवरून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची रोख रोकड २५ लाख रक्कमेची लुटमार केली.हि घटना शनिवारी सकाळी साडेअकरा वाजता घडली बँक कर्मचारी गणेश पहिलवान यांनी पैठण येथील मार्केट यार्ड येथील असलेली जिल्हा मध्यवर्ती बँकेतून २५ लाख रुपये रक्कम घेऊन दावरवाडी जिल्हा मध्यवर्ती बँकेची पंचवीस लाख रुपये घेऊन येताना पैठण पाचोड महामार्गावरील दावरवाडी शिवारात ही घटना घडली पाठिमागुन भरधाव वेगाने आलेल्या दुचाकिवरील दोन अज्ञात चोरट्यांनी थेट बँक कर्मचारी गणेश पहिलवान यांच्या गाडीवर जोराचा दगड मारला तो दगड पहिलवान यांनी हुकवला असता चोरट्यांनी त्यांची गाडी थांबवत थेट पहिलवान यांच्या वर झडप घालत त्यांना रोडवर खाली पाडत धक्का बुकी करत रकमेची बॅग हिसकावून डेरा गावच्या मार्गानी त्यां चोरट्यांनी पळ काढला

या लुटमारीत जिल्हा मध्यवर्ती बँकेची रोख रक्कम रुपये ( २५ लाख ) रुपयांची लुटमार झाली असून, या लुटमारीची माहिती पाचोड पोलिसांना खबर मिळताच घटनास्थळी येऊन ज्या जागेवर अज्ञात चोरट्यांनी लूट मार केली त्या जागेची पाहणी व पंचनामा केला पाचोड पोलिस ठाण्याचे सपोनि सचिन पंडित, उपनिरीक्षक राम बारहाते, फौजदार गोविंद राऊत आदींनी तात्काळ धाव घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला.या घटनेचा पुढील तपास पाचोड पोलीस स्टेशन करीत आहे

# वनविभागाचा अवैध लाकूड वाहतूकीवर कारवाईचा फार्स!

## शिरूर तालुक्यात वृक्षतोडबंदी, चाराईबंदी, कुर्हाडबंदीचा फज्जा, सर्रास होतेय अवैध लाकूड वाहतूक ?

शिरूर कासार ।प्रतिनिधी

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासनस्तरावरून निसर्गसंगोपन संवर्धनाच्या उपाय योजना राबवण्यात येत आहेत. वन्यजीव संरक्षणास वृक्षतोडीवर कायद्यान्वये प्रतिबंध लावण्यात आले असले तरी बीडच्या शिरुर कासार तालुक्यात नियमांची सर्रास पायमल्ली केली जात आहे.विशेष म्हणजे यास जबाबदार वनविभागाकडूनच खतपाणी घालण्यात येत असल्याने निसर्गप्रेमींतून संताप व्यक्त होत आहे.

खासगी क्षेत्राच्या तुलनेत किमान ३२ टक्के वनक्षेत्र या निकषांनुसार बीडच्या शिरुर कासार तालुक्यात सन १९९२ मध्ये महाराष्ट्र शासनाची शेकडो हेक्टर जमीन राखीव वनक्षेत्र म्हणून घोषीत झाली. देखभालीसह संगोपनाची जबाबदारी असलेल्या वन विभागाकडून तालुक्यात मोजक्या वनक्षेत्रात वृक्षलागवड करण्यात आली.

मात्र, काही महामार्ग, राज्यमार्ग लगतच्या जमीनीवर प्रभावी उपाय योजना राबवण्यात वन विभागाला अद्याप मुहूर्त सापडला नाही. परिनामी सताड पडलेलं राखीव वनक्षेत्राचं माळरान मानवी अतिक्रमणाच्या विळख्यात सापडलं आहे. त्यामुळे तालुक्यात वनक्षेत्राची घट वनजीवांच्या अस्तीत्वावर बेतली आणि भक्ष्याच्या शोधात हिस्त्र, शिकारी वनजीवांनी माणवी वस्त्यांकडे मोर्चा वळवला.



वृक्षतोडीवर नियंत्रण नाही जबाबदार प्रशासनाच्या अधिकारी कर्मचार्यांना हाताशी धरून बेसूमार वृक्षतोड केली जात आहे. खासगी क्षेत्रातील वृक्षतोडीसाठी शासनाच्या वनखात्याने परवानगीसह काही निकष लागू केले असले तरी चक्क चिरीमिरी घेवून सोयीस्कर विनापरवाना वृक्षतोड, वाहतूक केली जात आहे. वनक्षेत्रातही नियमांचा फज्जा राखीव वनक्षेत्रात कुर्हाडबंदी, चराईबंदीचे कडक निर्देश असताना तालुक्यात घनदाट वनासह राखीव वनक्षेत्रात चराईबंदीचा फज्जा उडाला आहे. याशिवाय कोट्यावधी रुपये पाण्यावर खर्च करून जगवलेल्या झाडवर कुर्हाड चालवण्यात येत असल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिक सांगत आहेत.सर्रास लाकुड वाहतूक तालुक्यात विना नंबरच्या वाहनातून सर्रास लाकूड वाहतुक करण्यात येत आहे. दरम्यान, कधी अंधाराचा फायदा घेवून तर कधी भल्या पहाटे लाकूड वाहतूक करण्यात येत असली तरी जबाबदार प्रशासनातील अधिकारी, कर्मचार्यांच्या संगनमतानेच अवैध लाकूड वाहतूकीला बळ मिळत आहे यात शंका नाही.

अतिक्रमणाला बळ राखीव वनक्षेत्रात मानवी अतिक्रमण होत असताना वनविभाग जानिवपूर्वक डोळेझाक करत आहे. प्रत्यक्षात वनक्षेत्राच्या हद्दबंदीचे सोयीस्कर कारण पुढे करत अतिक्रमण धारकांकडून हात ओले करून अतिक्रमणाला वनविभागाकडूनच बळ मिळत असल्याचा आरोपही केला जात आहे. कारवाईचा फार्स तालुक्यातील खालापुरी शिवारात नुकतीच वनविभागाकडून अवैध लाकुड वाहतूक करणार्या एका टॅम्पोवर कारवाईचा बडेजावपणा करण्यात आला आहे. प्रत्यक्षात कारवाईमध्ये वाहनात लाकुड कोणते?, त्याचे बाजा मूल्य किती?, फडझाडचे लाकुड आहे का?, तोडपरवाना आहे का? या बाबींचा कसलाही खुलासा करण्यात आलेला नाही. शिवाय कारवाईत जप्त वाहनाची तडजोड करता यावी या उद्देशाने ते शिरुर शहरा जवळील एका सॉमिलच्या आवारात लावण्यात आले आहे. ज्यामध्ये चिंच या झाडाचे लाकुड असल्याचा संशय निसर्गप्रेमीतून व्यक्त केला जात आहे.

# भावी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांसाठी मोफत बाटली बंद पाणी वाटप ; नगरपालिकेत पिण्याच्या पाण्याची वानवा :- डॉ. गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

**बीड नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजताच नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी अर्ज भरण्यास इच्छुकांची पालिकेत मोठी गर्दी वाढली आहे. मात्र, अर्ज भरण्यासाठी आलेल्या इच्छुक आणि समर्थकांचीच नव्हे तर निवडणूक कर्मचार्यांचीही पालिकेत पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः पंचाईत होत आहे.**

पालिकेतील पिण्याचे पाणी फिल्टर अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. पाणी उपलब्ध नसल्याने अर्जदार आणि नागरिकांना पाणी प्यायला बाहेरच्या हॉटेलमध्ये जावे लागत आहे. पाणी खरेदीसोबत चहाचा खर्चही करावा लागत असल्याने त्यांच्यावर अनावश्यक आर्थिक भुर्दंड पडत आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पालिकेच्या मुख्य इमारतीतच पाण्यासाठी ही धावपळ होत असल्याने प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नगरपालिका कार्यालयात पिण्याच्या पाण्याची आणि शौचालये दुरुस्तीची तातडीने उपाययोजना करण्यात यावी असे निवेदन मुख्याधिकारी नगरपरीषद बीड शैलेश फडसे यांना देण्यात आले.यावेळी डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि शेख युनुस च-हाटकर यांच्या मार्फत निवडणूक अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या भावी नगराध्यक्ष आणि नगरसेवक आणि त्यांचे समर्थक यांना मोफत बाटली बंद पाण्याचे वाटप करण्यात आले

निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव आणि मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी निवडणूक कामासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीही मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात अपयश आल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे.याकडे प्रशासन आणि भावी लोकप्रतिनिध्यांचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि शेख युनुस च-हाटकर यांच्या पुढाकाराने आज (दि.१७) मोफत बाटलीबंद पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.



## शौचालयाअभावी भावी लोकप्रतिनिधींची कुचंबना

शहराचे भावी नेतृत्व करण्याचे स्वप्न पाहत अर्ज भरण्यास आलेल्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या इच्छुकांना आणखी एक मोठी अडचण सहन करावी लागत आहे. पालिकेच्या तळमजल्यावरील वाहन पार्किंग परिसरातच उघड्यावर लघुशंका करण्याची वेळ अनेकांवर येत आहे. पहिल्या मजल्यावरील शौचालये पत्रे लावून बंदिस्त करण्यात आली आहेत. निवडणुक कार्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना शौचालयासाठी दुसरा-तिसरा मजला चढावे लागत आहे.पालिकेच्या इमारतीत सर्वत्र घाण, थुंकीचे डाग, भिंतींची दुरवस्था अशी परिस्थिती असून स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# छत्रपती संभाजी महाराज यांचा अवैध पुतळा उभारणी प्रकरणी दहा जनावर गुन्हे दाखल

माजलगाव ।प्रतिनिधी

शहरातील संभाजी चौक या ठिकाणी शनिवारी पहाटे दोन वाजता छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा रात्रीतून उभा करण्यात आला म्हणून दहा जणांविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील बायपास रस्त्यावर संभाजी चौकात शनिवारी पहाटे २चे दरम्यान वाजता काही युवकांनी लोखंडी सांगाड्यावर आठ फूट उंचीचा छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारला. या पुतळ्यावर एक बॅनर होते,त्यावर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांचा फोटो व नाव आढळून आले. त्यावर अंदाजे आठ फुटांचा अनधिकृत पुतळा उभारला.पुतळा उभारण्यात शासनाची कुठलीही कायदेशीर परवानगी नसल्याने नगर परिषदेने याबाबत पोलिसांत



तक्रार दिली.पोलिसांनी घटनास्थळी सीसीटीव्ही तपासणी करून त्याआधारे बाळराजे आवारे पाटील व सुशील सोळंके (रा.सादोळा) यांच्यासह आठ ते दहा जणांविरोधात कायदेशीर कारवाई करून अनंत नामदेव वाघमारे नगरपरिषद सुपरवायझर प्रभाग क्रमांक १ यांच्या फिर्यादीनुसार शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# विकासाचा ध्यास , प्राजक्ता राहुल बोरेकर हाच श्वास ; प्रभाक क्र २ मध्ये मतदारांचा उदंड प्रतिसाध!



गडब / सुरेश म्हात्रे .

पेण नगरपरिषदेच्या निवडनुकिचे बिगुल वाजले असुन प्रभाग क्र . २ मधील वातावरण आता चांगलेच तापले आहे या प्रभागातून आम्ही पेणकर या प्रभागातून युवती व तडफदार उमेदवार प्राजक्ता बोरेकर यांनी आपल्या प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे . विकास हाच ध्यास हे ब्रिदवाक्य घेऊन निवडनुकीच्या रिंगणात उतरलेल्या प्राजक्ता बोरेकर यांना प्रभागातील मतदानांनकडून , विशेषता तरुणी वगोकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र पेण नगरपालीकेकडे उमेदवारी अर्ज भरताना दिसुन आले .

प्रभाग क्र .२ मध्ये येणाऱ्या प्रभांगामध्ये त्याची लक्षणिय काम असल्याचे दिसुन आले या सपुर्ण भागात महिलांचा वाटा मोठ्या प्रमाणात होता . त्यांचा साधेपणा आणि जनसपर्क दांडगा असल्याने नागरीकांचे त्यांना उत्स्फुर्त स्वागत मिळत आहे घरोघरी प्रचारादरम्यात महिल्यांनी औक्षण करून जेष्ठ नागरीकांचे आशीर्वाद हे त्याच्यासाठी जमेची बाजु ठरत आहे .

# शिवसेनाप्रमुखबाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन





सावळदबारा ।प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुखबाळासाहेब ठाकरेयांच्या स्मृतीदिननिमित्तअभिवादनकरण्यात आले. सोमवार रोजी सावळदबारा येथील शिवसेना उद्धवबाळासाहेब ठाकरेसोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालय येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुखबाळासाहेब ठाकरेयांच्या स्मृती दिना निमित्तअभिवादनकरण्यात आले. यावेळी शिवसेना उद्धवबाळासाहेब ठाकरेसोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते,दिनकर शिपल्कर, एकनाथ सपाटे, शेषराव पाटील,मुनाफ सय्याद,गजानन आप्पा चोपडे, लक्ष्मण सोनवणे, किसनराव देशमुख,वजीर तडवी, भास्कर पाटील, गंगाराम जाधव, साहेबराव सपकाळ, प्रल्हाद नरोटे, नामदेव सुरडकर, रवी सुरडकर, मधुकर अंभोरे , शेख उस्मान, कृष्णा टिकारे, समाधान नरोटे , भिकन खान आदी ग्रामस्थ होते.

# अशोक दळवी यांचे दुःखद निधन

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १७ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजता सिग्मा हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथे उपचारा दरम्यान वासरवाडी ग्रामपंचायतचे सदस्य ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक आप्पा दळवी यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर बीड येथील अमरधाम स्मशानभूमी येथे शोकाकुल वातावरणात सायंकाळी चार वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.



बीड शहरालगत असलेल्या वासनवाडी ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य तथा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक चळवळीत सक्रिय असणारे अशोक आप्पा दळवी यांच्या जाण्याने दळवी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रवींद्र दळवी यांचे ते मोठे बंधु होते. त्यांच्या कुटुंबात पत्नी, दोन मुले, दोन मुली तसेच पाच भाऊ व तीन बहिणी असा त्यांचा मोठा परिवार आहे.त्यांचे वडील उत्तमराव दळवी यांनी सर्व मुलांना उच्च शिक्षित केले. मुलींना उच्च शिक्षित करून शासकीय सेवेत लावले. उच्च शिक्षित व आर्थिक संपन्न असा दळवी परिवार आहे. त्यांच्या जाण्याने सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या वर्गामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आप्पांच्या अंत्यविधीला नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार त्याचबरोबर शैक्षणिक, राजकीय, आरोग्य क्षेत्रामध्ये कार्य करणारे सर्व घटकातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दळवी परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# चैन स्नॅचींग करणारा अट्टल गुन्हेगार ताब्यात घेवुन स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने केले १० गुन्हे उघड

बीड ।प्रतिनिधी

मा. पोलीस अधीक्षक सो बीड यांनी, बीड जिल्हयात घडत असलेल्या गुन्हयाचे अनुषंगाने आढावा बैठक घेवून गुन्हे उघडकीस करण्याचे आदेश पोलीस निरीक्षीक स्थानीक गुन्हे शाखा बीड यांना दिले होते. स्थानिक गुन्हे शाखा, बीड येथील शिवाजी बंटेवाड पोलीस निरीक्षक, श्रीराम खटावकर पोलीस उप निरीक्षीक व त्याचे टिम मधील पोलीस अमंलदार यांनी पोलीस स्टेशन शिवाजी नगर गुरंन ४८४/२०२५ कलम ३०४ (२) भारतीय न्याय संहिता-२०२३ मधील आरोपीचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदासरा मार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा वैभव नारायण आडोळे रा. वेरला ता. मोर्शी जि. अमरावती याने व त्याचे साथीदाराने मिळून केला असुन तो सध्या नवगण राजुरी ता.जि.बीड येथील बस स्थानक येथे त्याचे साथीदारासह आला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही व नमुद पोलीस अमंलदार असे सरकारी व खाजगी वाहनाने जावुन त्याला व त्याचे साथीदाराला ताब्यात घेण्यात आले. आरोपी क्रमांक १) वैभव नारायण आडोळे



रा. येरला ता. मोशी जि. अमरावती यांने व त्याचा साथीदार विधीसघर्षग्रस्त बालक यांनी मागील साधारण दिड ते दोन महीन्यापासून बीड शहरात ०३, छ. संभाजीनगर ०४, जालना ०१. अहिल्यानगर ०१ असे एकुण ०९ चैन स्नॅचिंग गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. नमुद आरोपीतांकडुन गुन्हयातील चोरी गेलेले सोन्याचे दागिने किंमत ९,२७,६८० व मोबाईल नग ०४ व इलेक्ट्रॉनीकवजन काटा किंमत १,५५,०००/- व एक मोटरसायकल किंमत ५०,०००/- असा एकुण ११,३२,६८०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. निष्पन झालेले गुन्हे खालील प्रमाणे आहेत. १) पोलीस स्टेशन शिवाजी नगर गुरंन ४८४/२०२५ कलम ३०४ (२) भारतीय न्याय संहिता-२०२३ २) पोलीस स्टेशन शिवाजी नगर गुरंन ५०८/२०२५ कलम ३०४ (२), ३(५), भारतीय न्याय संहिता-२०२३ ३) पोलीस स्टेशन शिवाजी नगर गुरंन ५२०/२०२५ कलम ३०४ (२), ३(५), भारतीय न्याय संहिता-२०२३ ४) पोलीस स्टेशन सिडीको (एम. आई.डी.सी) छत्रपती संभाजीनगर शहर गुरंन ५९२/२०२५ कलम ३०४ (२),३(५), भारतीय न्याय संहिता-२०२३ ५) पो.स्टे. गेवराई गुरनं ६८५/२०२५ कलम ३०३ (२), ३ (५) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा नोंद आहे. ६) जिल्हा जालना :: पोलीस स्टेशन एस. बी. जालना गुरंन ९५०/२०२५ कलम ३०९ (४), ३ (५) भारतीय न्याय संहिता-२०२३ ७) छ. संभाजीनगर शहर :: पोलीस स्टेशन पुंडलीकनगर गुरंन ४१०/२०२५ कलम ३०९ (४), ३ (५) भारतीय न्याय संहिता-२०२३ ८) छ. संभाजीनगर शहर : पोलीस स्टेशन सिडको गुरंन ६२२/२०२५ कलम ३०९ (४), ३ (५) भारतीय न्याय संहिता-२०२३ ९) छ. संभाजीनगर शहर पोलीस स्टेशन सातारा गुरंन ४६८/२०२५ कलम ३०४ (२), भारतीय न्याय सहिता-२०२३ १०) जिल्हा अहिल्यानगर :: पोलीस स्टेशन तोफखाना गुरंन १०३६/ २०२५ कलम ३०९ (४), ३ (५) भारतीय न्याय संहिता-२०२३

तसेच नमुद आरोपीतांवर खुन, चैन स्नॅचींग, बँक रॉबरी, मोबाईल चोरी, असे इतर गुन्हे महाराष्ट्र व बाहेर राज्यात दाखल आहेत.नमुद आरोपीतांना पुढील तपास कामी पोलीस स्टेशन शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे स्वाधीन केले आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री सचिन पांडकर, मा. पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली श्रीराम खटावकर पोलीस उप-निरीक्षक, पोह/सोमनाथ गायकवाड, पोहः राहुल शिंदे, मपोह/स्वाती मुंडे, पोकों/अश्फाक सय्यद, पोकॉ मनोज परजणे, पोकों/विकी सुरवसे, पोकों/सिध्देश्वर मांजरे यांनी केली आहे.

# बायजाबाई चंदु देसले यांच्या हिप रिप्लेसमेंट या आजारावरील उपचारासाठी नाशिक जिल्ह्यातील गरीब कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दिलासा !

## संकेत तुकाराम सानप सर यांच्या प्रयत्नांना यश, तात्काळ १ लाखाचा निधी उपलब्ध

मुंबई मंत्रालय ।प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी व लोकसेवा हाच आपला धर्म मानून काम करणाऱ्या मुंबई मंत्रालयातील आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे नाशिक जिल्ह्यातील गरीब व गरजू कुटुंबातील रुग्ण बायजाबाई देसले या महिला भगिनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

देसले हे गेल्या काही काळापासून गंभीर आजाराशी झुंज देत असून, उपचारासाठी मोठा खर्च होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबासाठी एवढा खर्च परवडणारा नव्हता. याची दखल घेत मंत्रालय प्रतिनिधी संकेत सानप यांनी वैद्यकीय कागदपत्रांसह शासन दरबारी पाठपुरावा करून मदतीची फाईल मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठवली. अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर



नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली १ लाख रुपयांची मदत मंजूर करून रुग्णाच्या कुटुंबाच्या हाती पोहचवण्यात आली.

या मदतीमुळे बायजाबाई देसले यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयातील वाढते खर्च, औषधोपचार व इतर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. या निर्णयाबद्दल गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक जनतेकडून संकेत सानप यांचे अभिनंदन होत आहे.संकेत तुकाराम सानप यांनी यावेळी भावना व्यक्त करताना सांगितले की, गरीब, शेतकरी, मजूर, दिव्यांग आणि आजारपणाशी झगडणाऱ्या प्रत्येक गरजू कुटुंबासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा मोठा आधार आहे. शासनाच्या प्रत्येक योजना व मदतीचा लाभ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे. अनिल कानवडे यांना मदत मिळाल्याने माझ्या सेवाकार्यातील एक ध्येय साध्य झाल्यासारखे वाटते.मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांनीही या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, संकेत सानप यांच्यासारखे तरुण प्रतिनिधी जर अशा पद्धतीने जनतेच्या समस्यांचा पाठपुरावा करत राहिले, तर खऱ्या अर्थाने शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल.

बायजाबाई देसले यांच्या कुटुंबीयांनी या मदतीबद्दल मुख्यमंत्री, निधी प्रमुख तसेच संकेत तुकाराम सानप यांचे आभार मानले असून गावातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. सामाजिक कार्य आणि जनसेवा हाच मार्ग निवडलेल्या संकेत सानप यांच्या या कार्यामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळत आहे.शासनाची मदत जनतेच्या हाती हा उद्देश साध्य करताना आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी दिलेला हा दिलासा समाजातील वंचितांसाठी आशेचा किरण ठरला आहे.



# पंचशिलाच्या आचरणाने मानवी जीवनात सकारात्मक बदल घडवून येतो– भिक्खु धम्मशील थेरो

## आंबेडकरवाडी येथे एकदिवसीय धम्म संस्कार शिबिर उत्साहात संपन्न

जालना ।प्रतिनिधी

भिक्खू धम्मशील थेरो बीड व भिक्खू पय्यावर्धन हिंगोली यांच्या मार्गदर्शनाखाली आंबेडकर वाडी निधोना ता.जी. जालना येथे एक दिवसीय धम्म संस्कार शिबिर मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाले. सदर शिबिराचे आयोजन यशोदीप निवास उपासिका यशोदाआई खरात यांच्या निवासस्थानी खरात परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. सकाळी ९:०० वाजता निधोना येथील सरपंच यांच्या हस्ते दीप व धुप प्रज्वलित करून व महापुरुषांच्या प्रतिमांची पूजा करून या धम्म संस्कार शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.सदर शिबिरामध्ये ५५ ते ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता. सकाळी ९:०० ते संध्याकाळी ६:०० या वेळेत हे धम्म संस्कार शिबिर संपन्न झाले.या शिबिरात मुलांना बुद्ध वंदना,ध्यान साधना,धम्म संस्कार व पाली भाषेचे ज्ञान देण्यात आले. सोबतच तथागत उपदेशित पंचशीला चे महत्व मानवी जीवनामध्ये किती अमूल्य आहे. या तत्त्वाचे पालन केल्याने मानवी जीवनाचे मंगल कसे होते,मानवी मनावर कशाप्रकारे या तत्त्वज्ञानामुळे सकारात्मक परिणाम होतो. व यातून सील सदाचाराचे परीशुद्ध जीवन कसे जगता येते, यावर मार्गदर्शन करण्यात आले.येणारी पिढी सुसंस्कृत व्हावी तथागत भगवान बुद्धांनी उपदेशलेल्या शील सदाचाराचे महत्व मुलांना कळावे व नीतीमतेने त्यांनी आपले जीवन जगावे व आपले भावी आयुष्य सुरक्षित करावे.यासाठी सदर शिबिराचे आयोजन खरात परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.शिबिराच्या यशस्वीतेसाठी श्रद्धावान उपासक कैलास जी खरात शिल्पाताई खरात, रोहित खरात व त्यांच्या संपूर्ण कुटुंबाने परिश्रम घेतले.

# अंबड नगर परिषद निवडणूक २०२५ मध्ये भाजपात प्रचंड बंडाची ठिणगी!

## निष्ठावंतांना डावलून आयात उमेदवारांना प्राधान्य दिल्याने कार्यकर्त्यांत असंतोष उसळला ?

अंबड / फारोक शेख

अंबड शहरात नगर परिषद निवडणुकीची धामधूम सुरू असताना भारतीय जनता पक्षामध्ये प्रचंड असंतोषाचा स्फोट झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.अनेक दशकांपासून पक्षाशी निष्ठा राखणाऱ्या कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक देत काँग्रेस-राष्ट्रवादीतून आयात केलेल्या चेहऱ्यांना तिकीटांचा पाऊस पाडल्याने मुळ भाजपामध्ये तीव्र नाराजी उसळली आहे.

निष्ठावंतांना दुय्यम आयात नेत्यांना प्राधान्य

भाजपच्या अध्यक्षपदासाठी श्रीमती देवयानी केदार कुलकर्णी यांना उमेदवारी देण्यात आली असली तरी त्यांची संपूर्ण राजकीय कारकीर्द काँग्रेसमध्ये गेल्याची चर्चा जोरात आहे.दुसरीकडे जनसंघ-भाजपाचे जुन्या निष्ठावंत दिपक ठाकुर यांच्या पत्नीला तिकीट नाकारले गेल्याने कार्यकर्त्यांमध्ये संताप ओसंडून वाहताना दिसत आहे.

नगरसेवक पदांमध्येही परिस्थिती अधिकच विस्फोटक

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अध्यक्षपद भूषवलेले काकासाहेब कटारे आणि सुरेश गुढे यांना भाजपने उमेदवारी दिली तर मुळचे भाजपाचे कार्यकर्ते अरुण उपाध्ये आणि औदुंबर बागडे यांना थेट बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.कुचे यांची मुस्कटदाबी-







### टोपे यांच्या रणनीतीने अंबडमध्ये परिवर्तनाची जोरदार चर्चा

पक्षात असंतोषाचा ज्वालामुखी स्थानिक आमदार नारायण कुचे यांनी उमेदवारी वाटपात एकछत्री कारभार करत निष्ठावंत कार्यकर्त्यांवर मुस्कटदाबी केली असल्याचा आरोप कार्यकर्त्यांमधून धडाधड पुढे येत आहे.यामुळे भाजपात रुष्टतेचे वादळ उठले असून मतपेटीतूनच नाराजीचा स्फोट होईल अशी चर्चा अंबड शहरात सर्वत्र रंगू लागली आहे.

भाजपमध्ये घराणेशाहीचे आरोप स्वतःचे लोकच पुढे कार्यकर्ते दुर्लक्षित फक्त पैशाच्या जोरावर आणि स्वतःच्या घरातील व्यक्तींना पुढे करून तीन पिढ्यांपासून झटणाऱ्या कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले असा आरोप आता दबक्या आवाजात नव्हे तर उघडपणे केला जात आहे.अनेक भाजप कार्यकर्ते खुल्या शब्दांत सांगू लागले.निष्ठा गायीला गवतात आणि आयात लोकांना उमेदवारी हातात राजेश टोपेची रणनीती ठरतेय धडाकेबाज अंबडमध्ये परिवर्तनची हवा दुसरीकडे माजी मंत्री राजेश टोपे यांनी सर्वसमावेशक पद्धतीने समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व देत मजबूत पॅनेल उभे केले आहे.विशेष म्हणजे शिवप्रसाद चांगले या सदैव जनतेच्या प्रश्नांवर धावून जाणाऱ्या सर्व समाजात स्वीकारार्ह आणि शहर विकासाची तळमळ असलेल्या चेहऱ्याला उमेदवारी देऊन टोपेंनी स्वच्छ आणि ठाम संदेश दिला आहे.राजेश टोपे यांच्या विकासकामांचा मजबूत पाया आणि सर्वसमावेशक उमेदवारांमुळे अंबडमध्ये परिवर्तन अटळ अशी चर्चा आता शहराच्या गल्ली-बोळात जोरात सुरू झाली आहे. अंबडमध्ये राजकारण तापले प्रचारापूर्वीच समीकरणे बदलू लागली भाजपमध्ये उसळलेला बंडाचा ज्वालामुखी आणि राष्ट्रवादी-काँग्रेससोबतची राजेश टोपेंची रणनीती यामुळे अंबड नगर परिषद निवडणुकीत जबरदस्त उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# नळदुर्गची दिशा नागरी पतसंस्था लुटणारे आरोपी ४८ तासात जेरबंद

## आरोपीकडून १ किलो ४९२ ग्रॅम ७०० मिली वजनाचे दागिने स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांनी केले जप्त




धाराशिव / बिलाल कुरेशी

दि ०८.११.२०२५ रोजी नळदुर्गच्या दिशा नागरी पंतसंस्थेमधील कर्जदारांचे तारण ठेवलेले ४ किलो ७६३ ग्रॅम सोने व २,२१,००० रू रोख रक्कम असा एकूण ०२, ६३,६३,२७२ रूपयांचा मुददेमाल चोरीस गेला होता. सदरील गुन्हयातील अट्टल चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखा पथकाने मोठ्या शिताफिने अटक करून मुद्देमाल देखील काही प्रमाणात जप्त करण्यात यश मिळवले आहे.

सदरबाबत पोस्टे नळदुर्ग गुरनं ३९८ / २५ क ३१६ (५), ३३१ (४), ३०५, ६१ (२), ३ (५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि विनोद इज्जपवार यांचेकडे देण्यात आला होता. नमुद गुन्हयाचे तपासात तांत्रिक विश्लेषणातून बँकेत कामास असणारा लिपीक नामें राहूल राजेंद्र जाधव, रा नळदुर्ग याने त्याचे साथीदारांचे मदतीने सदर चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यावरून त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे केलेल्या चौकशीतून त्याचे साथीदारांची नावे समोर आली. तसेच चोरीस गेलेला मुददेमालही त्यांचेकडेच असल्याची माहिती प्राप्त झाली.पोनि इज्जपवार यांनी तात्काळ सपोनि कासारव पथक यांना अटक आरोपीच्या साथीदारांचा शोध घेण्याबाबत आदेशीत केले. तपासात निष्पन्न झालेले आरोपी हे अत्यंत अटटल, निर्ढावलेले आरोपी असून त्यांचेवर यापुर्वी दरोडा, जबरी चोरी सारखे तसेच शरीराविषयीचे अत्यंत गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले. तसेच त्यांचा सध्याचा काही ठावठिकाणा नसतानाही केवळ तांत्रिक विश्लेषणाचे मदतीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ०३ आरोपींना पुण्यातून वेगवेगळया ठिकाणांवरून अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले. त्यांचेकडे केलेल्या चौकशीतून नमुद आरोपींनी चोरी केलेल्या मुददेमालापैकी काही मुददेमाल शेतातील विहीरीत लपवून ठेवला असल्याचे सांगितले. नमुद ठिकाणी जावून शोध घेतला असता एकूण १ किलो ४९२ ग्रॅम ७०० मिली वजनाचे ०१,००,७५,७२५ रूपये किमतीचे दागिने मिळून आल्याने पंचनामा करून जप्त करण्यात आले आहेत. अदयापपर्यंत नमुद गुन्हयात १. राहुल राजेंद्र जाधव, २. सुशिल संजय राठोड, दोघे रा नळदुर्ग ३. संजय अमृत जाधव, रा लाडवंतीवाडी, कर्नाटक, ४. शिलरत्न महादेव गायकवाड, रा औराद ता उमरगा या ०४ आरोपींना अटक करण्यात आली असून ते सध्या पोलीस कोठडीत असून त्यांचेकडे अन्य साथीदार व मुददेमालाबाबत तपास सुरू आहे. पोलीस अधिक्षक श्रीमती रितू खोखर यांनी सदर गुन्हयाचे पार्श्वभुमीवर जिल्हयातील सर्व सहकारी पतसंस्थांना त्यांचे सुरक्षा ऑडिट करण्याचे व आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.सदरची कामगिरी मा. श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक धाराशिव व मा. श्री निलेश देशमुख, पोलीस उपअधिक्षक तुळजापूर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, सपोनि नंदकिशोर सोळंके, पोउपनि ईश्वर नांगरे, पोह दत्तात्रय राठोड, पोह शौकत पठाण, पोह जावेद काझी, पोह फरहान पठाण, पोह दयानंद गादेकर, पोह बळीराम शिंदे, पोना अशोक ढगारे, योगेश कोळी, चापोह सुभाष चौरे, रत्नदिप डोंगरे, नागनाथ गुरव, प्रकाश बोईनवाड यांचे पथकाने केली आहे.



## प्रभाग क्रमांक १५ मधुन अनु.जाती पुरुष गटातुन मिलींद पेठे तर सर्वसाधारण महिला गटातुन

धाराशिव ।प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १५ अ मधील जनसंपर्कात असणारे सलीमभाई शेख यांची सुन हिना अजहर शेख सर्वसाधारण महिला गट तर अनुसूचित जाती पुरुष गटातुन सामाजिक सेवा जपणारे मिलींद पेठे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटातुन पार्टीचा एबी फॉर्म जोडुन उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

सर्वांच्या मदतीला धावून जाणारे व्यक्तीमत्त्व अशी ओळख असणारे सामाजिक कार्यकर्ते सलीम भाई शेख यांची सुन असुन त्यांचाच वारसा त्यांचे कुटुंब चालवित आहेत,नागरी मुलभूत सुविधा व प्रभागातील नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न केला जाणार असुन सामाजिक भान जपणारे उमेदवार मिलींद पेठे यांच्या सोबतीने विकासाची कामे करण्यासाठी प्रयत्नशील राहु असे मत त्यांनी व्यक्त केले.राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टि व पार्टिचे जिल्हाध्यक्ष प्रताप भैय्या पाटील यांनी आमच्या वरती विश्वास टाकला त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाहीत, मतदारांनी आम्हाला मतदान करुन नगर सेवकाची संधी द्यावी अशी विनंती देखील त्यांनी केली आहे.

# ह.भ.प. संपत काका निपटे यांचे निधन

वडवणी ।प्रतिनिधी

पिंपरखेड येथील वारकरी संप्रदायातील एक प्रतिष्ठित नागरिक तथा प्रख्यात किर्तनकार ह.भ.प. बळीराम महाराज निपटे यांचे वडील ह.भ.प. संपतराव बाबुराव निपटे उर्फ काका यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. संपतकाका निपटे म्हणून ते पंचक्रोशी मध्ये परिचित होते.



वारकरी संप्रदायात बालपणी संत भगवानबाबांचे सानिध्य तर तरुणपणी संत भिमसिंह बाबा यांच्या समोर गायन करण्याची संधी काकांना मिळाली होती. बाबांनी संपत काकांच्या सुमधुर आवाजातील गायनाचे कौतुक केले होते. जुन्या काळी मॅट्रिक पास झालेल्या काकांना वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यास होता. ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला घरीच प्रथमोपचार देण्याची तसेच शासकीय रुग्णालयात घेऊन जाऊन उपचार मिळवून देण्यासाठी त्यांनी खूप योगदान दिले. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांसाठी ते फॅमिली डॉक्टरच होते. शिस्तप्रिय स्वभावामुळे वरुन कडक दिसायचे परंतु लोकांना वेळोवेळी सहकार्य करताना त्यांच्यातील प्रेमळ, मृदूपणा जाणवायचा. त्यामुळे ते पिंपरखेड गाव आणि परिसरातील लहानथोरांचे लाडके काका होते. माजी केंद्रीय मंत्री जयसिंगराव गायकवाड, माजी मंत्री आ. प्रकाश दादा सोळंके यांच्या सोबत त्यांचे जिवाभावाचे संबंध राहीलेले आहेत. अगदी मागील पंधरा दिवसांपूर्वी पर्यंत त्यांची तब्येत ठणठणीत होती. मात्र अचानक तब्येत बिघडल्याने बीडमध्ये उपचार केले मात्र उपयोग झाला नाही. त्यांच्या पश्चात पत्नी, प्रख्यात किर्तनकार ह.भ.प. बळीराम महाराज निपटे यांच्यासह दोन मुले, एक मुलगी, पुतने नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. काकांच्या निधनामुळे पिंपरखेड गावावर शोककळा पसरली आहे.

## ३६ व्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या पदकविजेत्या

# खेळाडूंचा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या हस्ते सत्कार

बीड ।प्रतिनिधी

३६ वी परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथे अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये बीड जिल्हा पोलीस दलातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली आहे. या चमकदार यशाबद्दल पदकविजेत्या सर्व खेळाडूंचा भव्य सत्कार व अभिनंदन सोहळा पोलीस मुख्यालयात आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी सर्व खेळाडूंचा



पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

या प्रसंगी बोलताना त्यांनी म्हटले, कोणतेही काम करताना १००% प्रयत्न, शिस्त, निष्ठा आणि काम हीच पूजा अशी भावना ठेवली, तर यश निश्चित मिळते. बीड जिल्हा पोलीस दलाने पुढील काळातही अशीच उत्तरोत्तर गौरवास्पद कामगिरी करत राहावी. या कार्यक्रमाद्वारे बीडमध्ये पहिल्यांदाच पदकविजेत्या खेळाडूंसाठी स्वतंत्र अभिनंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षकांच्या या प्रेरणादायी कृतीमुळे खेळाडूंमध्ये नवचैतन्य, उत्साह आणि आत्मविश्वास संचारला आहे.

रिवॉर्डची घोषणा

खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी खालीलप्रमाणे आर्थिक रिवॉर्ड जाहीर केले.सुवर्ण पदक विजेते - प्रत्येकी २,०००/-.रौप्य पदक विजेते प्रत्येकी १,५००/-, कांस्य पदक विजेते - प्रत्येकी १,०००/- या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, खेळाडू व अधिकारी यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कॉंवत यांचे समवेत अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. वेंकटराम, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस उपअधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे व जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व खेळाडू अंमलदार उपस्थित होते.

# गेवराई आणि पवार घराण्याचे तीन पिढ्यांपासून ऋणानुबंध आहेत नगर परिषदेला पाहिजे तेवढा निधी देऊ - आमदार सुरेश धस

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील नागरिकांचे आणि बाळराजे पवार यांच्या कुटुंबाचे गेल्या तीन पिढ्यांपासून ऋणानुबंध आहेत. त्यामुळे, नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार गिताभाभी पवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, यात शंकाच नाही. मायबाप मतदारांनी छप्पर फाड विजय मिळवून द्यावा,

शहराच्या विकासासाठी आमचे सरकार निधी कमी पडू देणार नाही. असे वचन देऊन, गेवराई च्या जनतेने माजी मंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली नगर परिषदेची सत्ता द्यावी, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केले आहे.रविवार ता. १६ रोजी सकाळी अकरा वाजता भारतीय जनता पक्षाचे निरीक्षक आमदार सुरेश धस यांनी गेवराई शहरात येऊन भारतीय जनता पक्षाच्या निवडणुकीचा आढावा घेतला. माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार यांच्या निवासस्थानी आ. धस यांनी भेट देऊन नगर परिषदेचे उमेदवार, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी माजी आमदार ड. लक्ष्मणराव पवार, युवा नेते बाळराजे पवार, शिवराज पवार, नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी, ड.भगवान घुंबार्डे, राहुल खंडागळे, अरूण मस्के, माजी नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, भरत गायकवाड, शिनू भाऊ बेदरे, लक्ष्मण राऊत, जगन पवार, लक्ष्मण चव्हाण, संजय इंगळे, शेख राजू ,शेख रईस,राजू पठाण, वाजेद चौधरी, बाळासाहेब गायकवाड, भैय्या कांबळे, रंजीत खाजेकर, मुन्ना शेठ, विठ्ठल मोटे, सय्यद एजाज,

यांच्यासह शेकाडो कार्यकर्ते उपस्थित होते.आमदार धस म्हणाले



की, गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या बाजुने जनतेमधून चांगला कौल आहे. महाराष्ट्रात सत्ता आहे. केन्द्र सरकार ही आपले आहे. तुम्ही नगर परिषद आमच्या ताब्यात द्या, गिताभाभींना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या. विकासाच्या दृष्टिकोनातून सर्वाधिक निधी देऊ, असे आवाहन ही आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

# बीड जिल्ह्यात लंपी आजाराने जनावराचा मृत्यू

**शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी - प्रा. बबनराव आंधळे**

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात विविध तालुक्यांमध्ये साधारणता ८०० ते ९०० जनावरांना लंपी त्वचारोग बाधा झालेली आहे. यात ५० ते ६० जनावरांचा मृत्यू देखील झाला असून जे शेतकरी पशुपालक आहेत ते चिंतेत आहेत. या गंभीर परिस्थितीमध्ये यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे.



## बीडचा तारा थेट मंत्रालयावर चमकला...!

# विठ्ठल रामप्रसाद बादाडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह सहा परीक्षा उत्तीर्ण...!

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव या छोट्याश्या खेड्यातील तरुण श्री. विठ्ठल रामप्रसाद बादाडे यांनी परत एकदा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मोठ्या पदाला गवसणी घालत, सलग ०६ सरकारी नोकऱ्या मिळवण्याचा विक्रम केला आहे..!काडीवडगाव येथील शेतकरी रामप्रसाद राजाराम बादाडे यांचा मुलगा विठ्ठल यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेतच झाले व त्यानंतरचे शिक्षण देवडी येथील रेणूबाई देवी विद्यालयात झाले.विठ्ठल तसा पहिलीपासूनच शाळेत हुशार होता. त्याने दहावी मध्ये ८४% गुण घेत द्वितीय क्रमांक पटकावून पुढील उच्च शिक्षणाची तयारी दर्शवली परंतु घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे त्याने मोठ्या शहरात जाणे टाळून वडवणी येथील सिंदफना माध्यमिक विद्यालयात बारावीचे शिक्षण पूर्ण करत असताना त्याला व्यवसाय क्षेत्रात उतरण्याची इच्छा झाली.पण तेव्हाच टंकलेखन परीक्षेत चांगल्या गुणांनी पास झाल्यामुळे त्याने स्पर्धा परीक्षेत उतरून मोठा अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले.



बीड येथे बलभीम महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत त्याने लघुलेखन (शॉर्टहँड) चे खाजगी प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली.सातत्य, जिद्द व चिकाटीच्या जोरावर त्याने लघुलेखन/स्टेनो क्षेत्रात अव्वल दर्जा प्राप्त केला व महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच जिल्हा न्यायालय भरतीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. तेव्हाच जगावर पसरलेल्या कोरोना संकटाचा सामना विठ्ठलला सुद्धा करावा लागला व शहर सोडून गावी परतावे लागले. पण त्यांनी हार न मानता शेतात आई वडिलांसोबत काम करत अभ्यास चालूच ठेवला व अनेक स्पर्धा परीक्षा दिल्या. २०२५ पासून निकाल येण्यास सुरुवात झाली. जिल्हा न्यायालय बीड येथे शिपाई, लिपिक लघुलेखक तसेच वन विभागात स्टेनोग्राफर वर्ग २ अधिकारी (गट - ब) आणि आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मंत्रालय लघुटंकलेखक तसेच नि. श्रे. लघुलेखक अशा अनेक पदांकरिता निवड झाली.यापुढे सुद्धा असच अभ्यास करत क्लास १ ची तयारी ते करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी बीडच्या कार्तिकी व समर्थची महाराष्ट्र संघात निवड

## अरूणाचल प्रदेश व पंजाब मध्ये रंगणार राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धा

बीड /प्रतिनिधी

इटानगर ( अरूणाचल प्रदेश ) येथे होणाऱ्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय तायक्कांदो क्रीडा स्पर्धेसाठी कु. कार्तिकी संदिप मिसाळ हीची तर जालंधर ( पंजाब ) मध्ये होणाऱ्या ८ वी राष्ट्रीय कॅडेट तायक्कांदो स्पर्धेसाठी समर्थ सचिन आंधळे यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

महाराष्ट्र शासन आयोजित महाराष्ट्र संघाचे राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा पुर्व सराव शिबिर वर्धा जिल्हा क्रीडा कार्यालय येथे होणार आहे, अशी माहिती तायक्कांदो असोशिएशन फ महाराष्ट्र मुंबई संघटनेचे अध्यक्ष डॉ अविनाश बारगजे यांनी दिली आहे.भारत सरकारच्या स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित ६९ वी राष्ट्रीय शालेय तायक्कांदो स्पर्धा २०२५ इटानगर ( अरूणाचल प्रदेश ) येथे २६ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२५ दरम्यान पार पडणार आहे. १७ वर्षे वयोगटात होणाऱ्या या राष्ट्रीय शालेय तायक्कांदो स्पर्धेसाठी कार्तिकी संदिप मिसाळ हीची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे , तर जालंधर ( पंजाब ) मध्ये दिनांक २० ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय कॅडेट तायक्कांदो स्पर्धेसाठी १४ वर्षे वयोगटात समर्थ सचिन आंधळे याची महाराष्ट्र राज्य तायक्कांदो संघात निवड झाली आहे. त्याने शिर्डी जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडलेल्या ८ वी महाराष्ट्र राज्य कॅडेट तायक्कांदो स्पर्धेत ४१ किलो वजनगटात सुवर्णपदक पटकावले आहे. या राज्यस्तरीय कॅडेट स्पर्धेत कल्याणी घुगे ( रौप्यपदक ) , सार्थक ठेंगल व अक्षदा तांदळे ( कांस्यपदके ) यांनीही चांगली कामगिरी नोंदवली. हे दोन्ही खेळाडू बीड जिल्हा क्रीडा संकुलातील डॉ. अविनाश बारगजे यांच्या चॅम्पियन्स तायक्कांदो अकॅडमीचे नियमित खेळाडू आहेत. राज्य स्पर्धेसाठी शेख अनिस , ऋत्विक तांदळे , देवेंद्र जोशी , बाळासाहेब आंधळे यांनी संघ प्रशिक्षक व व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.या खेळाडूंना जिल्हा संघटनेचे मार्गदर्शक डॉ योगेश क्षीरसागर , डॉ सारिकाताई क्षीरसागर , जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर सर , जिल्हा संघटनेचे अध्यक्ष श्री. नितीनचंद्र कोटेचा , श्री.दिनकर चौरे, डॉ अविनाश बारगजे , जया बारगजे , श्री. बन्सी राऊत, श्री. भरत पांचाळ , डॉ. विनोदचंद्र पवार, श्री.मनेश बनकर, श्री.सुनिल राऊत, श्री.प्रसाद साहू यांच्यासह जिल्हा संघटनेच्या सर्व वरिष्ठ राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय खेळाडू , अधिकारी , सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेख ज़ाकेर यांच्या अंबर फॅमिली रेस्टॉरंटचे थाटात उद्घाटन

## खवय्यांना मिळणार बिर्याणीसह विविध खाद्यपदार्थ एकाच ठिकाणी



बीड ।प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवर परिसरात असलेल्या अंबर हॉटेलचे संचालक शेख ज़ाकेर यांनी दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रविवार रोजी बार्शी रोडवर अंबर फॅमिली रेस्टॉरंट ची थाटात सुरुवात केली. त्यांच्या या नवीन दालनामुळे त्यांनी बनविलेल्या चवदार बिर्याणी सह खवय्यांना आता इतरही अनेक चविष्ट खाद्यपदार्थ एकाच ठिकाणी मिळणार आहे.

शेख ज़ाकेर हे अनेक वर्षांपासून अंबर हॉटेल च्या माध्यमातून एकापेक्षा एक खाद्यपदार्थ बनविण्यासाठी प्रसिद्ध आहेत. हॉटेलमधील खारे आणि गोड पदार्थ तर ते चांगले चवदार बनवितातच शिवाय वेगवेगळ्या प्रकारच्या बिर्याणी बनवण्यातही त्यांचा हातखंडा आहे. यामुळेच लग्न समारंभ असो की इतर कोणतेही कार्यक्रम ते फक्त बीड शहरच नाही तर संपूर्ण बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात जाऊन सुद्धा बिर्याणी आणि गोडधोड खाद्यपदार्थ बनवितात. आर्थिकदृष्ट्या अत्यंत सर्वसाधारण कुटुंबातून आलेले शेख ज़ाकेर त्यांच्यात असलेल्या जबरदस्त स्वयंपाक कलेबद्दल सर्व परिचित आणि प्रसिद्ध आहेत. अशा या लोकप्रिय व्यक्तीने आता या व्यवसायात एक पाऊल पुढे टाकून बीड शहरातील बार्शी रोडवर ऐतिहासिक ख़ज़ाना विहिर जवळ अंबर फॅमिली रेस्टॉरंटचे १६ नोव्हेंबर २०२५ रविवार रोजी संध्याकाळी उद्घाटन केले. यावेळी त्यांचे मेहुणे मुक्तपत्रकार एस.एम.युसुफ़ यांनी त्यांचे अभिनंदन करत शाल व पुष्पगुच्छ देत हृदयी शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अंबड नगर परिषद निवडणूक २०२५ भाजप उमेदवारी अर्ज दाखल

## भव्य शक्ती प्रदर्शनाने शहरात शक्तीचा जबरदस्त ठसा



अंबड /प्रतिनिधी

अंबड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने आज उमेदवारी अर्ज दाखल करताना शक्तीचे प्रचंड प्रदर्शन करत अंबड शहरात अभूतपूर्व जनसमुदायाची उपस्थिती दाखवून एकप्रकारे निवडणुकीचा बिगुल वाजवला.

भाजप उमेदवारांच्या विजयी संकल्प पदयात्रा आणि विजयी संकल्प सभेला अंबडकर नागरिकांनी दिलेला उस्फूर्त, टाळ्यांनी आणि घोषणांनी दुमदुमणारा प्रतिसाद पाहता संपूर्ण शहरात भाजपची लाट असल्याचे चित्र स्पष्टपणे उमटले.

कराड-कुचे यांच्या प्रमुख उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल पदयात्रेचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातून करण्यात आला. पुढे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात पदयात्रेचा समारोप झाला. या ठिकाणी घेतलेल्या विजयी संकल्प सभेत उत्साहाचा अक्षरशः महापूर उसळला.

यानंतर माजी केंद्रीय मंत्री खा. डॉ.भागवत कराड,आमदार नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप उमेदवारांनी दमदार शक्ती प्रदर्शन करत नामनिर्देशन अर्ज दाखल केले.

नेतृत्वाचे पाठबळ कार्यकर्त्यांचा जाज्वल्य उत्साह या कार्यक्रमात माजी केंद्रीय अर्थमंत्री खा.डॉ. भागवतजी कराड,माजी आमदार विलास बाप्पू खरात,आमदार नारायण कुचे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या शिस्तबद्ध आणि जोशपूर्ण पदयात्रा पार पडली.त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह शिगेला पोहोचला होता.प्रमुख मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमात उपस्थित रासपाचे नेते ओमप्रकाश चितळकर,डॉ. राजेंद्र ठोसर,बबनभाऊ बुंदेलखंडे,अनिलराव कोलते पाटील,हरिश्चंद्र बाबा शिंदे, भगवान मात्रे,अशोक लांडे, देविदास कुचे,केदार कुलकर्णी, तारेख चाऊस, पांडुरंग शिंदे तसेच भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे जमलेले मतदार बंधू-भगिनी.अंबडमध्ये भाजपचा विजयाचा नारा बुलंद जनतेच्या प्रचंड प्रतिसादामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले असून अंबड नगर परिषदेत कमळ फुलणारच असा आत्मविश्वास नेतृत्वाने व्यक्त केला.अंबड शहरात आज पाहायला मिळालेली गर्दी, शिस्तबद्ध पदयात्रा आणि उत्साहाने भरलेला घोषणांचा जयघोष निवडणूक २०२५ मध्ये भाजपचा विजय निश्चित असल्याचे संकेत देऊन गेला

# माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचे कार्य राज्याला दिशादर्शक- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण



छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले दिवंगत वसंतराव नाईक यांनी राज्याच्या दुष्काळमुक्तीसाठी केलेली जलसंधारणाची कामे तसेच अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्णतेसाठी राबविलेल्या उपक्रमांचा आजही राज्याला मोठा लाभ होत आहे. राज्याला दिशा देणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको येथे हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, मनपा आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा राज्याच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. राजकारणात विविध पदावर काम करताना महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्याचे देखील काम केले. बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण केली. समाजाला शिक्षणाकडे वळविण्यासाठी अनेक शिक्षण संस्थांची निर्मिती केली असून समाजातल्या विविध परंपरा जोपासल्या पाहिजेत यासाठीही त्यांनी प्रयत्न केला, राजकीय सामाजिक जीवनामध्ये नगराध्यक्ष पदापासून आमदार, खासदार, मुख्यमंत्री अशा विविध पदांवर नाईक साहेबांनी काम केले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वाधिक काळ राहिलेले मुख्यमंत्री म्हणून दिवंगत नाईक साहेबांच्या नावाची नोंद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून आज दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण होत आहे, हा दिवस खऱ्या अर्थाने बंजारा समाजासह आपल्या सर्वांसाठी दिवाळीप्रमाणेच आहे. महानगर वेगाने वाढत असून महानगर सुंदर झाले पाहीजे, कुंभमेळयासाठी येणारे भाविक छत्रपती संभाजीनगर येथे येतील, त्यादृष्टीने शहराच्या रस्ते तसेच सर्वांगिण विकासासाठी निधीची तरतूद गरजेची असल्याचे ते म्हणाले. दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुतळा आपल्या सर्वांना प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले. महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



# गडब गावात मुख्य बाजारपेठेत गावठी दारू विक्री जोमात; वडखल पोलिसांचे दुर्लक्ष!

गडब/सुरेश म्हात्रे

पेण तालुक्यातील गडब गावात मुख्य बाजारपेठेच्या अगदी जवळ ग्रामपंचायत शेजारी एका किराणा मालाच्या दुकानात गावठी दारू विक्री होत असल्याचे निदर्शनात येत आहे,

सदर गावठी दारू विक्रेत्याकडून परप्रांतीय नागरिक मोठ्या प्रमाणात दारू खरेदी करण्यासाठी रिघ लावत आहेत. सदर दारू विक्रेत्याकडून वडखल पोलीस हप्ते वसुली करत आहेत याबाबत सगळीकडे चर्चेचा विषय ठरत आहे, या दारू विक्रीमुळे गडब नाक्यावर रोजच्या रोज भांडणे तंटे होत आहेत याबाबत जिल्हा पोलीस प्रमुख आचल दलाल यांच्याकडे दारू विक्रेत्याची तक्रार करणार असून सदर विजेवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी समस्त गडब वासियांकडून होत आहे.

# अंबड नगर परिषद निवडणूक २०२५ नामांकन प्रक्रियेला उस्फूर्त प्रतिसाद

## एकूण १४६ अर्ज दाखल अंबडमध्ये रंगणार चुरशीची लढत



अंबड /प्रतिनिधी :- अंबड नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठीची नामनिर्देशन प्रक्रिया आज अत्यंत शांततेत, सुरळीत आणि उत्साहात पार पडली. शहरातील नागरिक उमेदवार आणि कार्यकर्त्यांच्या मोठ्या उपस्थितीमुळे निवडणुकीचे वातावरण अक्षरशः तापलेले दिसले. दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल झालेल्या अर्जांची संख्या पाहता यंदाची निवडणूक चुरशीची, बहुकोनी आणि अत्यंत रोमांचक होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

नगराध्यक्ष पदासाठी तब्बल १४ अर्ज अंबडमध्ये होणार रंगतदार लढत अंबड नगरपालिकेच्या केवळ एकाच नगराध्यक्ष पदासाठी तब्बल १४ उमेदवारांनी नामनिर्देशन दाखल केले.इतक्या मोठ्या संख्येतील अर्जांमुळे प्रचंड स्पर्धा निर्माण झाली असून अंबडमध्ये यंदा नगराध्यक्षपदाची मॅच रंगणार भारी अशी चर्चा शहरभर रंगली आहे.सदस्य पदांसाठी १३२ अर्ज अनेक वार्डांत बहुकोनी लढतीची चिन्हे अंबडमधील ११ वार्डांतील २२ सदस्य पदांसाठी १३२ अर्ज दाखल झाले आहेत.अनेक वार्डांत ५ ते १० पर्यंत दावेदार आढळल्याने यंदाच्या निवडणुकीत बहुकोनी टक्कर निश्चित झाली आहे.

शहरातील प्रत्येक वार्डमध्ये पॅनेल राजकारण,आघाड्या आणि बंडखोरी यामुळे वातावरण आणखी गरम होणारअसे संकेत मिळत आहेत.एकूण अर्ज संख्या १४६,नगराध्यक्ष सदस्य पदे मिळून एकूण १४६ नामनिर्देशन अर्ज दाखल.पुढील प्रक्रिया छाननी ते अर्ज मागे घेणे

नामनिर्देशन पत्रांची छाननी दि.१८ नोव्हेंबर २०२५ वेळ सकाळी ११.०० पासून ठिकाण : नगरपालिका कार्यालय तळमजला अंबड उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा कालावधी १९ ते २१ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी सर्व उमेदवार त्यांचे प्रतिनिधी, नागरिक व पत्रकारांना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक निःपक्षपाती आणि शांततेत पूर्ण करण्यासाठी सहकार्याचे आवाहन केले.

त्यांचे हे आवाहन निवडणुकीदरम्यान कायदा-सुव्यवस्थेची काळजी घेण्यासाठी महत्त्वपूर्ण मानले जात आहे.अंबडमध्ये निवडणूक रंगात २०२५ ची लढत होणार धगधगती दाखल झालेल्या विक्रमी अर्जांमुळे अंबड नगरीत निवडणुकीचा जल्लोष आणि स्पर्धेची धग पूर्ण उफाळली आहे.सर्वांचे लक्ष आता छाननी आणि अंतिम उमेदवारांच्या यादीकडे लागले आहे.




# ऊत' भावनांचा उद्रेक: आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेता मराठी चित्रपट २१ नोव्हेंबरला प्रदर्शित

## लातूरचे सुपुत्र पुरुषोत्तम वाघ यांची चित्रपटात भूमिका

लातूर ।प्रतिनिधी

'ऊत' भावनांचा उद्रेक हा मराठी चित्रपट येत्या २१ नोव्हेंबरला प्रदर्शित होत आहे. चित्रपटात लातूर जिल्ह्यातील मुरुड नायगावचे सुपूत्र पुरूषोत्तम वाघ यांची महत्त्वाची भूमिका आहे. लातूरच्या या कलावंताचा दमदार अभिनय पाहण्यासाठी प्रेक्षकांनी चित्रपटगृहात नक्की यावे, असे आवाहन निर्मात्यांनी केले आहे.

वाघ यांचा अभिनय क्षेत्रातील अनुभव मोठा आहे; त्यांनी यापूर्वी अनेक मराठी व हिंदी मालिका, लघुपट, जाहिराती तसेच एका मल्याळम् चित्रपटातही काम केले आहे. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम.ए. (नाट्यशास्त्र) पूर्ण केलेले आहे. प्रदर्शनापूर्वीच चित्रपटाला आंतरराष्ट्रीय १८ पुरस्कार प्राप्त आहेत. लातूरचे सुपुत्र आणि गुणी कलाकार वाघ यांनी या चित्रपटात 'नंदू' ची भूमिका साकारली आहे. त्यांची ही भूमिका संघर्ष, रोमान्स आणि एका उत्कृष्ट नेत्यामध्ये असणारे गुण दाखवणारी आहे.

# महाराष्ट्राची लोककला जगप्रसिध्द

निलम शिर्के - सामंत

बीड /प्रतिनिधी

भारत देश हा विविधा कलांनी गुण असणारा देश आहे.प्रत्येक राज्याची आपली विशिष्ट अशी संस्कृती व लोककला आहे. ती जोपासण्याचा व प्रसार, प्रचार करण्याचा व बालकांमध्ये रूजविण्यासाठी प्रत्येक राज्य प्रयत्नशील आहे. ज्ञात असलेल्या, नसलेल्या कलांची ओळख करून ती आपल्या माध्यमातून रसिकांपर्यंत जाणं गरजेच आहे. आपल्यामध्ये विविध कला गुण गुतलेले असतात. यांची ओळख करून घेऊन सादर करणं आवश्यक आहे. आपल्या आयुष्यात ठामपणे हो नाही म्हणता आलं पाहिजे. प्रत्येक स्पर्धेमध्ये जिंकण्यासाठी सहभागी न होता, आनंद घेण्यासाठी व शिकण्यासाठी सहभागी व्हावे.त्या सोबतच बालरंगभूमीच्या माध्यमातून कला संस्कार शिबीरांचे आयोजन केले जाते.

वय वर्ष अठराच्या खालील मुलांना या शिबीरात मोफत प्रवेश आहे. अशा मुलांनी कला संस्कार शिबीरात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.नृत्याचा स्थायी भाव आनंद घेत घेत आनंद देणे हा आहे.बालरंगभूमी मुलांच्या कला गुणांच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे. असे बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलमताई शिर्के सामंत बीड येथील जल्लोष लोककलेच्या या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या.

बालरंगभूमी परिषद बीड शाखेच्या अध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर तसेच परिक्षक म्हणून श्री.दिलीप खंडेराय, संजयजी जाधव,राजू सोनवणे,केदार देशमुख, पदाधिकारी स्नेहलताई पाठक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर मंचावर उपस्थित होते.




बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित जल्लोष लोककलेचा या लोककला गायन,वादन,नृत्य महोत्साचे आयोजन दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड शाखेच्या वतीने सौ.केएसके महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी याकार्यक्रमात परिसरातील ४३८ बालकलावंत व संघ या कार्यक्रमास सहभागी झाले होते. हा कार्यक्रम दोन सत्रात झाला. दिवसभर बालकलावंत त्यांच्या विविध कला दोन मंचावर सादर केल्या.

या जल्लोष लोककलेचा कार्यक्रमात परिक्षकानी सहभागी झालेल्या स्पर्धकांपैकी पुढील प्रमाणे संघ व कलावंताची निवड केलेली आहे.यामध्ये वैयकतीक लोकगीत गायन या प्रकारामध्ये सर्वोत्कृष्ट म्हणून यश नाईकवाडे,पार्थ पवार यांना विभागून दिले तर उत्कृष्ट विशाखा व्हरकटे, उत्तम सिध्दी पाटील आणि आनंद धुताडमल यांना विभागून दिले. प्रशंसनीय वेदांत काजळे,स्वराली साळूंके यांना विभागून बक्षीसे देण्यात आली. लोकगीतसमूह गायनामध्ये सर्वोत्कृष्ट संस्कार विद्यालय,बीड उत्कृष्ट पोदार इंग्लीश स्कूल बीड, उत्तम-धुतेकर विद्यालय बीड, प्रशंसनीय-छत्रपती शाहू विद्यालय व स्वराली संगीत विद्यालय यांना विभागून देण्यात आले. समूह लोकनृत्य सर्वोत्कृष्ट म्हणून आर्ट ऑफ फन गेवराई, मंगळागौरी या नृत्याला देण्यात आले तर उत्कृष्ट म्हणून खोलेश्वर विद्यालय अंबाजोगाई (गांधळी),उत्तम विनायक विंद्यालय,बीड (शेतकरी नृत्य), प्रशंसनीय- केंब्रीड इटरनॅशनल स्कूल गेवराई,(मंगळागौरी) आणि चिंतेश्वर विद्यालय गेवराई (वाघ्या मुरळी) असे देण्यात आले.वैयक्तीक लोकनृत्यामध्ये सर्वोत्कृष्ट इश्वरी राधाकृष्ण वाघ,मधुरा महेश चिंचोलकर,उत्तम- वैष्णवी राहूल गायकवाड,प्रशंसनीय -समृध्दी सतिष काकडे व रूही राजेंद्र बडे यांना विभागून पारितेषिके देण्यात आले.लोकवाद्य वादन या प्रकारात सर्वोत्कृष्ट पदमाकर सरवदे, उत्कृष्ट संदीप कानडे (हालगी), उत्तम कबीर सोनवणे व रितेश कानडे तर प्रशंसनीय शुभम वाकसे व जयदेव कानडे यांना विभागून पारितोषिक देण्यात आले.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी केले. या समारोप कार्यक्रमासाठी बीड शाखेचे विलास सोनवणे, नामदेव साळूके,सुरेश साळुंके,मिलींद शिवणीकर,राहूल सोनवणे,दुष्यंता रामटेके व विजय राख, अमित गाढे,सुरेश थोरात,पवन शिंदे,रोहित पुराणीक,बाळासाहेब कांबळे,दिपक गिरी,प्रा. इंद्रजीत भांगे,प्रा.असलम शेखसह सर्व पदाधिकारी, रसिक,श्रोते, बालकलावंत मोठया संख्येने उपस्थित होते.

# सिंदफनाच्या महापुराने क्षतीपोहचलेल्या खडकेश्वर मंदिराचे लोकसहभागातून पुनर्निर्माण !

## सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे हस्ते शुभारंभ !

मानूर (प्रतिनिधी)

शिरूर कासार येथे सिध्देश्वर , खडकेश्वर आणि कपिलेश्वर असे तीन शिवालय असलेल्या शिरूर शहरातील सिंदफना नदिकिनारी खडकावर असलेल्या स्वयंभु खडकेश्वराचे लोकसहभागातून मंदिर बांधले होते मात्र सिंदफना नदिला आलेल्या महापुराने या मंदिराचे काम संपुर्णत: वाहून गेले आणि खडकेश्वर मंदिराला मोठी क्षती पोहचली होती , पुरग्रस्तांना सर्वस्तरातून मदत मिळाली मात्र मंदिर तसेच भग्नावस्थेत राहिले ही बाब लक्षात येऊन मंदिर पुनर्निर्मणची संकल्पना पुढे आली आणि लोकसहभागातून या पुनर्निर्माण कामाचा शुभारंभ सिध्देश्वर



संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे शुभहस्ते करून कामाला प्रारंभ करतांना श्रमदानाला देखील प्राधान्य देण्यात आले. शिरूरसह उत्तम नगर ,दहिवंडी आदी गांवचे तरूणांनी हाती टोपले खोरे घेतले . या वेळी नगरपंचायतचे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील, दिनेश गाडेकर ,अजय कुचेरीया ,गोकुळ पवार ,प्रताप कातखडे , अभिलाश गाडेकर आदि ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते .

अल्पावधीत खडकेश्वर मंदिर दर्शनासाठी भाविकांचे लक्ष बनून राहिलेले हे मंदिर सिंदफनेच्या महापुराचे लक्ष बनले आणि लोकवस्ती बरोबर बाजार ओटे ,दुकान आणि मंदिराला देखील त्याचा मोठा फटका बसला होता .शिवपिठाचे पुन्हा नव्याने उभारणी करण्यासाठी अनेकांनी अर्थिक योगदान तर दिलेच त्याबरोबर श्रमदानाचे देखील योगदान दिले जात असल्याने खडकेश्वराचे हे मंदिर लवकरच पुर्वस्थितीत तयार होणार आहे .

# आळंदी कासार धर्मशाळेचा सेवाभावी उपक्रम !

## ९००० वारक-यांना खिचडी वाटप !

मानूर (प्रतिनिधी)

श्रीक्षेत्र आळंदी येथे विश्वमाऊली संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७२९ वा संजिवन समाधी सोहळा सुरू असुन लाखो भाविक ईंद्रायणी तिरी माऊलीचा गजर करत आहेत ,येणा-या वारक-यांना एक सेवा म्हणून कासार धर्मशाळेच्या वतीने ९००० वारक-यांना एकादशी दिवशी फराळाची खिचडी तर द्वादशी दिवशी रविवारी सकाळपासुनच खमंग खिचडी देऊन सेवा समर्पित केली .माऊली प्रसाद घ्या असा आदरपुर्वक आग्रह केला जात होता .

संजिवन समाधी सोहळ्यासाठी लाखो भाविक आळंदीत आले असुन काहींची हक्काची व्यवस्था ही वेगवेगळ्या मठ धर्मशाळेत होत असते तरिही हजारो वारकरी मोकळ्या जागेवर थांबलेले असतात अशा वारक-यांना देखील अन्नदान देण्यासाठी अनेक संस्था सरसावत असतात , आळंदी कासार धर्मशाळा देखील अनेक वर्षापासुन दोन दिवस प्रसाद वाटप उपक्रम राबवत आहे . धर्मशाळेचे अध्यक्ष मोहनराव कोळपकर यांचेसह त्यांचे सर्व विश्वस्त सहकारी या उपक्रमाद्वारे



वारक-यांची सेवा करत आहेत .रविवारी खमंग खिचडी वाटपात अध्यक्ष मोहनराव कोळपकर ,माऊली भांडेकर ,यांचे सह शिरूर कालिका देवी संस्थानचे सचिव बापुराव गाडेकर ,दत्तात्रय परदेशी ,संतोष अंदूरे ,उमेश गाडेकर , ज्ञानेश्वरी पारायण फंडाचे अध्यक्ष अरूणजी वेळापुरे , विश्वस्थ बीडचे महारूद्र विर ,अणिलजी शेटे,पाथर्डीचे उमेश रासने आदिनी मोलाचे सहकार्य केले .

# समाजसेवक व शिक्षक पैठणकर राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने सन्मानित

बदनापुर (प्रतिनिधी)

(संजय भुजाळ) जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील किन्होळा येथील *समाजसेवक व परमानंद पब्लिक स्कूल, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर चे उपप्राचार्य *रामेश्वर छगन पैठणकर यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्यक्षेत्रातील आपार योगदान लक्षात घेऊन *दि.११ नोव्हेंबर २०२५,रविवारी, भारत इतिहास संशोधन मंडळ,पुणे येथे *साऊ ज्योती फाउंडेशन व रमाबाई आंबेडकर संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने *राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रामेश्वर पैठणकर हे फक्त शाळेतील कार्यपुरते मर्यादेत न राहता, शाळेबाहेरही श्री ताराशावली बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, किन्होळा. च्या माध्यमातून समाजसेवा आणि निसर्ग संवर्धनासाठी तत्पर राहतात. मागील चार वर्षापासून त्यांनी वाचन चळवळ सुरू केली आहे, गावात आपले सार्वजनिक वाचनालय, किन्होळा. या नावाने गावातील मुलांनी अभ्यास करावा व वाचन प्रेम वाढेल म्हणून वाचनालय सुरू करुन विद्यार्थ्यांचे ज्ञानवृद्धीसाठी कार्य केलेलं आहे.

तसेच दुर्गम भागातील त्यांच्या गावांमध्ये असलेले डोंगर माळांच्या जमिनीवर वृक्ष लागवडीचे कार्य हाती घेतली असून पर्यावरण संरक्षणासाठी सदैव कार्यकरत आहेत.विद्यार्थी प्रज्ञा जागृती या परीक्षेच्या आयोजन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रज्ञाला प्रकाश ज्योत आणण्याचे काम मागील दहा-बारा वर्षांपासून ते करत आहेत.मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप, स्पर्धा परीक्षेचे ज्ञान,योगा प्रशिक्षण शिबीरे,महिला, शेतकरी, आदिवासींसाठी,तरुण, पर्यावरण व विद्यार्थ्यांसाठी त्यांचे सदैव भरीव योगदान राहिले आहे. या सर्वांतून त्यांच्या कर्तुत्वाचा, देशभक्तीचा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श दिसून येतो.शाळेत विविध उपक्रम राबवून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य नैतिक मूल्य आणि समाजसेवेची जाणीव निर्माण करण्याचे कार्य केलेले आहे.पुणे येथे पार पडलेल्या या पुरस्कार वितरण कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामांकित अभिनेत्री,



समाजसेवक आणि साहित्यिक यांच्या हस्ते हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. रामेश्वर पैठणकर यांच्या पुरस्काराने केवळ किन्होळा व बदनापुर तालुकाच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याला अभिमान वाटत आहे. त्यांच्या निस्वार्थ कार्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, स्थानिक समाज आणि तालुका प्रशासन यांच्याकडून त्यांचे सतत कौतुक होत आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सामाजिक समन्वय, पर्यावरणाप्रती जाणीव आणि सेवाभावण्याची नवीन प्रेरणा निर्माण झाली आहे, ज्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी ते एक आदर्श ठरले आहेत.

# भारतीय जनता मजदूर संघाच्या प्रदेश सचिव पदी धनंजय कुलकर्णी तर मराठवाडा सचिव पदी चंद्रकांत पाटील यांची निवड

केज/प्रतिनिधी

भारतीय जनता मजूर संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शांताप्रकाशजी जाटव भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रशिक्षण प्रभारी अनुसूचित जाती व जन जाती प्रमुख यांच्या आदेशानुसार भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी प्रदेश सचिव पदी धनंजय कुलकर्णी यांची नियुक्ती केली तर मराठवाडा विभागीय सचिव पदी चंद्रकांत पाटील यांची नियुक्ती केली आहे.यावेळी असंघटित मजूर यांच्या न्याय हक्कासाठी प्रयत्न करणारी संघटना असून यासाठी राज्य स्तरावर विविध विभागाची बांधणी करून सर्व विभागाच्या मजूर व गोरगरीब लोकांसाठी काम करण्यासाठी आदेशीत केले.भारतीय जनता मजदूर संघ हा भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून काम करणारी संघटना असून या



संघटनाच्या सर्व प्रकारच्या माध्यमातील काम करणाऱ्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहे.औदयोगिक विभाग,सामाजिक विभाग,पत्रकारिता, सिनेमा,हॉटेल,जिंनीग कामगार,ऑईल मिल कामगार,साखर कारखाना कामगार, स्कुल कामगार,तसेच असंघटीत क्षेत्रातील सर्व कामगार अशा सर्व विभागातील कामगारांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी तसेच बांधकाम मजुरांना ज्या सुविधा सध्या मिळत आहेत त्या सर्व सुविधा इतर कामगारांना पण मिळायला हव्यात यासाठी काम करायचे आहे.यासाठी गाव पातळी पासून ते देश पातळीपर्यंत सांघिक बांधणी करत सामाजिक विकास साध्य करायचा आहे व भारताचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या संकल्पनेला सार्थ ठरवण्यासाठी काम करायचे असल्याचे राष्ट्रीय चिटणीस श्री.भाऊसाहेब घोडके यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी श्रीनिवास केजकर,शिवराज मुथळे, संदीप भूतडा हे यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी धनंजय कुलकर्णी व चंद्रकांत पाटील यांना निवडीचे पत्र देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# यशराज पंडित, शिवराज पवार या जोडीने नगरपालिका निवडणुकीचे वातावरण तापवले

## गेवराईत भाजपची प्रचारात आघाडी

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई नगर परिषद निवडणूकीसाठी भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजपनेते बाळराजे पवार यांनी एकत्रितपणे भाजपच्या उमेदवारांच्या विजयासाठी मोर्चे बांधणी केली असली तरी युवानेते यशराज पंडित आणि युवानेते शिवराज पवार या युवा नेत्याच्या जोडगोळीने गेवराईतील नगरपालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापवल्याचे दिसत आहे.

गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व २२ नगरसेवक पदासाठी होत असलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची लढत होणार हे स्पष्ट झाले आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने भाजप नेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखालील भाजपा उमेदवारांच्या पॅनलची चांगलीच ताकद वाढलेली दिसत आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आमदार विजयसिंह पंडित या दोन्ही पंडित बंधूंनी नगरपालिकेवर आपलेच वर्चस्व निर्माण व्हावे यासाठी कसोशीने प्रयत्न चालवले आहेत.



या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना एकनाथराव शिंदे गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या पक्षाचे उमेदवारही लढणार असले तरी खरी लढत भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यातच होणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ हा शेवटचा दिवस आहे. तरीही भाजपकडून युवा नेते यशराज बदामराव पंडित आणि युवा नेते शिवराज बाळराजे पवार या दोन्ही युवानेते शहरातल्या प्रत्येक प्रभागात जाऊन मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत आहेत. विशेष म्हणजे भाजपचे उमेदवारी अर्ज दाखल करताना हे दोघेही उपस्थित राहून उमेदवारांची बळ वाढवताना दिसत आहेत. युवा नेते शिवराज पवार यांची आई सौ गीता भाभी पवार या भाजपकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार असल्याने ते स्वतः मतदारांच्या भेटी घेऊन आशीर्वाद मागत आहेत. त्यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. तर दुसरीकडे युवा नेते यशराज पंडित यांना मानणारा मोठा युवा वर्ग आहे. त्यामुळे गेवराई शहरातल्या प्रत्येक गल्लीबोळात ते मतदारांच्या भेटीसाठी जाताना त्यांच्या समवेत युवकांचा मोठा गराडा पाहायला मिळत आहे. प्रत्येक ठिकाणी मतदारही मोठ्या उत्साहाने त्यांना भेटून भाजप उमेदवाराला पाठिंबा देताना दिसत आहेत. एकंदरीत प्रचाराच्या सभा आणि भाषणातून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाच्या तोफा डागण्याचे काम लवकरच राजकीय पक्षाच्या नेत्यांकडून होताना दिसेल. परंतु तत्पूर्वीच यशराज पंडित आणि शिवराज पवार या दोन्ही युवा नेत्याच्या जोडगोळीने गेवराईतील राजकीय वातावरण तापवायला सुरुवात केली आहे हे मात्र नक्की. या दोन्ही युवा नेत्यांच्या प्रचाराने युवा वर्ग मोठ्या संख्येने भाजपसोबत जोडल्या जात असल्याने याचा भाजपला न प निवडणुकीत चांगला फायदा होईल असे चित्र दिसत आहे.

# अँड.मयूर आंधळे यांचा राज्यस्तरीय आदर्श कार्य गौरव पुरस्काराने सन्मान

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा येथील युवा सरपंच अँड.मयूर आंधळे हे सदैव सामाजिक कार्यात अग्रेसर असतात तरी त्यांनी आतापर्यंत केलेले सामाजिक कार्याची पावती म्हणून त्यांना जय भगवान प्रतिष्ठान च्या वतीने राज्यस्तरीय आदर्श गौरव पुरस्काराने डॉक्टर तात्याराव लहाने व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला .

वडवणी तालुक्यातील अत्यत डोंगर रागाच्या कुशीत असणाऱ्या रुई पिंपळा गावचे सरपंच मयूर आंधळे यांनी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे माध्यमातून गावात विकासाचे नवे मापदंड निर्माण केले.असुन स्वच्छता अभियान, ग्रामविकास, रोजगार निर्मिती आणि शिक्षणासाठी त्यांनी घेतलेल्या उपक्रमांना शासन दरबारीं घेतली असुन त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आहे. ग्रामीण विकास, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक समरसतेसाठी त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे. त्यांच्या नेतृत्वातून आजची तरुण पिढी बदलाची दिशा घेत आहे गावच्या कार्यात झोकून देणाऱ्या तरुण नेतृत्वाचा सन्मान




जय भगवान युवा प्रतिष्ठान यांनी राज्यस्तरावर केला असून, वडवणी तालुक्यातील पिंपळा गावचे तरूण, युवा सरपंच अँड.मयूर शंकरराव आंधळे यांना आदर्श कार्यगौरव पुरस्कार २०२५जाहीर झालेला असुन ९ नोव्हेंबर ला दैत्यनांदूर येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये मध्ये हा सन्मान सोहळा पार पडला या सोहळ्याचे आयोजन मा. अजीनाथ भगवान दहिफळे (संस्थापक, जय भगवान युवा प्रतिष्ठान नांदूर) यांनी केले होते.

# भव्य शक्तिप्रदर्शन करत लोकविकास महाघाडीच्या सर्व उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल करताना निघालेल्या रॅलीने शहराचे वातावरण निघाले ढवळून

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याचा शेवटच्या दिवशी लोकविकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व पंधरा प्रभागातील ३१ उमेदवारांनी अंबाजोगाई शहरात जोरदार शक्तिप्रदर्शन करत आज सोमवार दि १७ रोजी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले. मागील ९ वर्षांपासून अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक झालेली नाही. त्यामुळे नगर परिषदेवर प्रशासक राज होते. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे लोकप्रतिनिधीचा नगर परिषदेवर अंकुश नव्हता. राज्य निवडणूक आयोगाने नुकताच नगर परिषदेच्या निवडणूक कार्यक्रम जाहिर केला असून सोमवार दि १७ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. नामनिर्देशन दाखल करण्याचा अंतिम दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व समविचारी पक्षाची लोकविकास महाआघाडी निर्माण करून या आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व आघाडीचे सर्व ३१ उमेदवार यांनी आज आपले नामनिर्देशन दाखल केले. अंबाजोगाई शहरातुन काढलेल्या महाघाडीच्या महारॅलीने शहराचे संपूर्ण वातावरण ढवळून निघाले होते. या महारॅलीमध्ये हजारोच्या जनसमुदाय सहभागी झाला होता. यामध्ये नवयुवक , महिला, तसेच जेष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त



प्रतिसाद दिसून आला. हे वातावरणात पाहून महाआघाडीचे सर्वेसर्वा राजकिशोर मोदी, नानासाहेब गाठाळ, माजी आमदार पृथ्वीराज साठे, बबनराव लोमटे , डॉ नरेंद्र काळे, महेंद्र निकाळजे, दीपक कांबळे, हाजी महमूद, खालेद चाऊस यांच्यासह महाआघाडीचे नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार हे भाराहून गेल्याचे दिसून येत होते. रॅलीची सुरुवात ही गुरुवार पेठ येथील जोधाप्रसादजी मोदी विद्यालयापासून निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे, सदर बाजार, मोची गल्ली, गांधी नगर , मंडी बाजार , पाटील चौक , मंगळवार पेठ , वीर सावरकर चौक बस स्थानक मार्गे नगर परिषद कार्यालयापर्यंत येऊन सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याने संपन्न झाली.भव्य अशा या महारॅलीच्या माध्यमातून राजकिशोर मोदी यांच्यावरील मतदारांचे प्रेम व जिव्हाळा तसेच यातून आगामी निकालाची झलक देखील दिसून आली. यामुळे विरोधी गटाच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याचे स्पष्ट संकेत पहावयास मिळत आहेत.लोकविकास महाआघाडीच्या माध्यमातून अंबाजोगाई शहरात नवनवीन विकासाच्या संकल्पना राबविण्यात येणार असल्याचा संकल्प राजकिशोर मोदी व त्यांच्या सर्व सहकारी उमेदवारांनी केला आहे. कोणतीही तयारी किंवा नियोजन नसतांना सुद्धा मतदार इतक्या उत्स्फूर्तपणे सहभागी झाला होता यामध्ये एकही व्यक्ती ग्रामीण भागातील नव्हता